पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४४

ऐतिहासिक घराणीं

[किंमत—१ रुपया ७ आणे किंवा २ शिलिंग ६ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 44.

KAIFIYATS AND GENEALOGIES.

This selection brings together the genealogies and accounts of about 80 historical families constructed by putting together various sources which are too numerous and too minute to be specified. It may be noted that Forrest and Parasnis have already published the Kaifiyats and genealogies of some of the more leading families : but with the advance of research many more names and families of historical repute have come into notice, and this renders desirable some means of tracing them and their connections with accuracy. This compendium of 80 more families will, it is hoped, facilitate further research and study. The following are the contents of the Kaifiyats (I) :—

1 Anyaba Rahatekar.
2 Anandrao Babar.
3 Anandrao Malhar Tanjavarkar.
4 Khatik Kumaji Baloji
5 Krishnarao Narayan Joshi.
6 Krishnasha of Jawhar.
7 Krishnaji Dabhade.
8 Khanderao Ganesh Odhekar.
9 Khando Gomaji Purandare.
10 Gangadhar Govind Bhanu.
11 Ganesh Shamraj Subhedar.
12 Chandrarao More.
13 Anandrao Gopal Supekar.
14 Trimbakrao Sonavani.
15 Daulatrao Lad Watharkar.
16 Naro Moreshwar Bhagwat.
17 Ramaji Yadav Bhovalkar.
18 Naro Ganesh Ok.
19 Pandurang Abaji Kale.
20 Parvatibai Kolhatkar.
21 Bachaji Vishvanath Khandekar.
22 Lilaram Narasinha Deshpande.
23 Bahiro Narayan Pingale of Pratapgad.
24 Balaji Raghunath Patwardhan.
25 Bajirao Subhanji Rananavare.
26 Mir Sadatulla Khan, Kiledar of Trimbak.
27 Mir Sahadat Tulakha.
28 Morshet Karanje.
29 Rangarao Vinayak Purandare.
30 Ravirao Sindia.
31 Ramchandra Nilkanth Page.
32 Yeshwantrao Bhonsle Sakhrikar.
33 Ramchandra Vyankatesh Gune Kalekar.
34 Lakshman Santajirao Dhaybhar.
35 Vithal Chintaman Punekar.
36 Khanderao Raste.
37 Vishvasrao Bhaskar Gokhale.
38 Vyankatrao Shivaji Marathe.
39 Sadashiv Shamrao Koregaonkar.
40 Sadashiv Raghunath Gadre.

II—Genealogies.

1 Anandrao Gopal Supekar.
2 Abaji Raghunath, Chitnis to Sindia of Gwalior.
3 Avji Kavde.
4 Ichharampant Dhere.
5 Krishambhat Kashibhat Rajarshi.
6 Konher Trimbak Ekbote.
7 Ganesh Narayan Dhadphale.
8 Chapaji Tilekar.
9 Janu Bhintada.
10 Janardan Appaji Erande.
11 Chahuji Naik Chihve of Purandar.

II—Genealogies—contd.

12 Tukaram of Dehu (Saint).
13 Trimbak Hari, Subha of Supa.
14 Dhondo Mahadeo, Senakarte.
15 Narasingrao Dhaygude.
16 Naro Anant Parchure.
17 Parashurampant Pratinidhi.
18 Pilaji Jadhavrao.
19 Prayag Anant Phanse.
20 Prataprao Gujar.
21 Baji Bhivrao Rethrekar.
22 Babaji Vithal Karkhanis of Purandar.
23 Balaji Kate, Deshmukh.
24 Manakeshwar Dhaygude.
25 Mahadaji Krishna Joshi.
26 Moropant Pingale.
27 Yeshwantrao Potnis.
28 Ragho Lakshman Purandare.
29 Ramchandra Ganesh Kanade.
30 Ramchandra Damodar Ambikar.
31 Shankaraji Malhar.
32 Shamji Govind Takle.
33 Shamrao Ambaji Kirkole.
34 Santaji Somvanshi.
35 Gopalbhat Barve.
36 Hari Ballal Phadke.
37 Bapuji Bhimsen Parasnis.
38 Mahadajipant Rajmachikar.
39 Naro Gangadhar Mujumdar.
40 Vishvanathpant Behere.
41 Gadadhar Pralhad Pratinidhi.
42 Hande, Deshmukh.

यादी उमाबाई कोम परशराम खंडेराव राहातेकर मुा पुणे सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ सन १२५३ फसली. आमचे भ्रतार यास पेशवे सरकारातून श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे यांणी तैनात व असामी व दिवाणगिरी वगैरे मामलतीसंमधे वेतन करून दिल्हे ते खाली लिप्रो

बीाा

९६०० बाा याद व तैनात जाबता

१५३२० मामलती संमधी वेतन पात्रत होते त्याचे दाखले सरकारात आहेतच

१०००० सर सुभा प्रांत कोकण

४५०० ताा सिवनेर

८२० तालुके देवगड

१५३२०

१५०० आसाम्या समधे वेतन याचे दाखले सरकारांत आहेत ते

१३५० ताो आमदाबाद येथील दिवानगिरीबदल रु.

२०० किले हडसर ताो सिवनेर येथील सबणिसीबदल वेतन रु.

१५५०

२६४७०

येणेप्रो पेशवे सरकारातून कुपणीसरकारचा आमल होय तोपरियेत पावले. पुढे कुपणीसरकारचा आमल जाल्यावर सदरहू उत्पन्नाची याद भ्रतार याणी सरकारांत दिल्ही त्याची नकल हाली नजर आहे. पुढे आमचे जाहागिरीचे नाव (गाव?) सरकारांत घेऊन भ्रतार यास पेणसीन दरसाल सालिना रुा च्यार हजार चांदवड ताा ६ माहे जून १८१९ इसवीस करून दिल्हे ते भ्रतार जिवंत होते तोपरियेत पावले. भ्रतार मयेत जाल्यावर बंदोबस्ताविसी यादी दिल्हा-वरून ताा ६ जून सन १८४३ रोजी मेहरबान कलकटर साहेब याजकडून हुकूम आला की तुम्ही व तुमची सवत ज्यानकीबाई या उभयेतास दर असामीस रुा २०० दोनसेप्रो ताहायात मिळण्याविसी सरकारचा हुकूम आहे. त्यास दोनशे

रुपयांत संवस्थानचे वाड्यात आमचे जातीचा गुजारा होत नाहीं. सिवाय कुटुंबांची माणसे आमची सून म्हाळसाबाई उा ३२ आहे तिजला काहीच मिळाले नाही ता ४ माहे आगटंबर सन १८४३ इसवी ऊर्फ अस्विन मास व यासिवाय हाली उत्पन्न गावचे कुलकर्ण मिळोन पंचवीस रुपयाचे आहे व आमची उमरवर्ष सुमारी ३२ ची आहे ता मार ज्यानकीबाईची उमर वर्ष ४९ ची आहे व ती आमची वडील सवत आहे ता मार

सही तुळसीची माळ खुद बाईची हातची आसे

¶*Umabai, wife of Parashram Khanderao alias Anyaba Rahatekar, submits her family Kaifiyat in which she says that the jagir granted to her husband by Bajirao was taken by the Company who granted him a pension in return. The pension was further reduced on his death. She therefore prays that the pension which is quite inadequate should be increased.*

No. 2] *[27-11-1843*

श्री

यादी नीलकंठराव व नारायणराव व जगदेवराव व बहिरजीराव व पर्वतराव बिन आनंदराव बाबर किकलीकर सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे वडील पूर्वी दिलीचे पातशाहापासी बहुत दिवस चाकरीस होते. नंतर सिवाजी माहाराज छत्रपति सातारकर राजपासी आंबोजीराव बिन जैतोजीराव बाबर याणी सेवाचाकरी केली. नंतर छत्रपति शाहूमाहाराज यांचे कारकीर्दीत आमचे आजे बहिरजीराव बिन आंबोजीराव याणी चाकरी केली. लढाईचे प्रसंग हरहमेशा बहुत वेळा पडत गेले तेथेहि बहुत कस्त मेहेनत मर्दुमी बहिरजीराव याणी केली. हे माहाराज याणी (पाहून) पालखी व पाचसे स्वाराचे पथक करून दिल्हे. पुढे काही दिवसानी बाळाजी विश्वनाथ पेशवे मोहिमेचे कामावर निघाले ते वेळेस माहाराज यास विनंती करोन आमचे आजे बहिरजीराव यास पेशवे याणी बराबर मागून घेतले. त्याजबराबर कामकाजेहि केली ती पाहून पेशवे याणी पागा देऊन बहिरजीराव यांस वस्त्रे देऊन आणि सरंजामास जांबगाव हली सिंदे आलिज्याबाहादूर यांजकडे आहे ते दिल्हे होते. पुढे भाऊसो पेशवे याजबरोबर सोनपतपानपतचे लढाईत पडले. नंतर पुणे मुकामी बहिरजी बाबर यांचे चिरंजीव नारायणजी बाबर, आमचे चुलते, यांचे नावे सरदारी श्रीमंतानी काईम करून सरंजाम दिल्हा ते गाव मौजे सतीरडरहटी पो कोकटनूर व मौजे साकत पो जामखेड व रतलगाव पो पांडे पेडगाव व मौजे सिरसोफळ ता पाटस प्रा पुणे,

येकून च्यार गाव सरंजामास लाऊन देऊन आणखी नख्त ऐवज पोत्या पौ रोजमुरा याप्रा नेमणूक करून दिल्ही. पुढे काही वर्षा(नी) शके १७१२ चे साली धारवाडास टिपूबराबरचे लढाईत नारायणजी बाबर पडले. त्यांचे बंधु आनंदराव बाबर, आमचे तीर्थरूप, यांस वस्त्रे पागेची देऊन सदरहू सरंजाम चालविला. पुढे जातीच्या तैनातीत मौजे किकली रुो चोविसे पावणेपाच तीन आणे आकाराचे श्रीमंत राजश्री बाजीराव सोा यांणीं देऊन बाकी तैनात रोख पोत्यातून देत होते. त्याप्रो चालत असता दरम्यान त्रिंबकजी डेंगले याचे व आमचे वैमनस्य होते यामुले त्याणी जबरदस्तीने आमचा सरंजाम घेतला. तेव्हा श्रीमंतास आर्ज आम्ही बहुत तरेने केला त्यावरून सदरहू गावची मोकलीक करून द्यावी आसे श्रीमंतांचे मनात वागले आणि जातीचे सरंजामाचे गावांऐवजी रोख साहा हजार रुो घेत जावे म्हणोन परवानगी जाली, त्याप्रो पावत आले. आणि ठाणे जालिहाल तालोके बदामी येथील ठाण्याचे बंदोबस्ताचे काम आमचे वडील अनंदराव याजकडे सांगितले आणि सदरहू सरंजामाचीहि मोकलीक करून देतो म्हणोन बोलिले. परंतु मोकलीक होण्यास दिवसगत लागली. नंतर पुन्हा श्रीमंतास विनंती केली, त्याजवरून सदरहू गावची मोकलीक करून द्यावी असी परवानगी जाली; तो इतकियात पेशवे सरकारचे व कंपणीसरकारचे बिघाड होऊन लढाई जाली. पुढे आष्टी येवतीचे लढाईत आमचे वडील पडले. नंतर पेशवे यांचे राज्याचा बंदोबस्त कंपणीसरकारनी करून दरोबस्त सरदार लोकांचा बंदोबस्त केला ते वेलेस आम्ही पेशजी प्रो सरंजाम आगर आमचे वडिलांचे नांवें पेशवाई आखेर साहा हजार रुो सालीना देत होते त्याप्रो चालवावे म्हणोन आर्जे केला. परंतु सरंजामाची मोकलीक जाली नाही व जातीस तैनात साहा हजार रुो नख्त चालत होते त्याप्रो चालविले नाहीत. ऐसियास, आमचे बंधू च्यार व आम्ही, येकून पांच बंधू व पुढे चिरंजीव असा कुटुंब मोठे आणि खर्च तर चालत नाही. याजकारिता सरकारास अर्जे आहे. तरी सदरहू सरंजाम व नख्त साहा हजार रुो सालीना नेमणूक याप्रो आमचे आम्हाकडेस पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने चाले असी तजवीज करणे हे सरकाराकडेस आहे. ताा २७ नवंबर सन १८४३ इसवी

सही—नीळकंठराव बाबर दस्तुर खुद.
सही—नारायेनराव बाबर दस्तुर खुद.
सही—जगदेवराव बाबर दस्तुर खुद.
सही—भहिरजी बाबर दस्तुर खुद.
सही—परबतराव बाबर दस्तुर खुद.

¶*This is a family history of Anandrao Babar presented by his descendants.*

7563

No. 3] [11-11-1829

पो तारीख. ११ नवंबर स. १८२९
इसवी.

श्री

अर्जी मल्हार अनदराव सुा सलासीन मयातैन व अलफ. त्याहावयास कारणे जे कुपणी सरकारचा व श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याचा तह वसईचे स्वारीस जाहाला तेव्हा वकीलीचे बोलणे सरकारतर्फन्य कुपणीसरकारात आमचे वडील कैलासवासी आनंदराव मल्हार याणी बोलावे याप्रो ठराव होऊन शके १७३८ पावेतो आमचे वडिलानी कुंपणी सरकारचे काम इमान्यइतबारे केले. नंतर त्याचा मृत्यु जाहाला. त्याजवरून मेहेरबान आलपिष्टंन साहिब याणी आमची मातुश्री वाल्होबाईचे नावे पेनसीन सालिना रुा ५०० पाचसे करून दिल्ही. नंतर शके १७४२ या सालात मातुश्रीचा आत:कालसमये आला तेव्हा मेहेरबान बडे साहेब याचा हुकूम घेऊन आम्हास दतपुत्र घेतले. नंतर मातुश्री मृत्य पावली. पेनसीन बंद जाहाली. घरची चीजबस्त होती ती आजपरियेत मोडून खाली. हली प्रपंचास उत्पन्न काही नाही. वडिलानी कुंपणी सरकारची नवकरी फार दिवस केली आहे. पदरचे जाणोन अर्जी लिहिली आहे तरी साहेबानी मेहेरबानी करून पेनसीन करून देऊन बदोबस्त केला पाहिजे.

¶*Malhar Anandrao represents that his father Anandrao Malhar served the last Peshwa and was present on his behalf during the negotiations of the treaty of Bassein. He begs that his father's pension should be continued to him.*

No. 4] [10-9-1828

पो तारीख १७ सपटंबर
स. १८२८ इसवी

श्री

साहेबाचे खिजमतीस कुमाजी बा बाळोजी खाटीक का चोंडे हली बा शेहर पुणे पेठ सोमवार सुा तिसा आशेरीन मयातैन व आलफ. तसलीमात बंदगी आर्जी करितो ऐसाजे. मेहरबान विस्टूरसाहेब फाकडे याची रसद नाना फडणीस व धोंडोपंत निरचुरे याणी घाटबंदी करून रस्त बंद केली ते वेळेस साहेबानी माझे बापास कौल देऊन आभय दिल्हें की, तुम्ही बकराची रस्त पोहचवावी. त्यावरून आम्ही तीन वेळ साहेबास रस्त पावती केली. चौथे खेपेस पेशवे

सरकारात कोण्ही चाहाड जाला. त्यावरून लोहोगडाहून पांच सातसे माणूस येऊन आमचा माल बकरी बुध सुमारी २५०० आडीच हाजार लुटीस गेली. व किल्यावर माझे बापास नेऊन डोके मारू लागले सबब खंडाबाा रुपये ३५० साडेतीनसे दिल्हे. या बाबे पेशजी मुबईस बडे साहेबास आर्ज केला. हुकूम व्हावा तो माझी आई मृत्य पावली याकरिता घरी निघून गेलो. हली साहेब मेहरबान होऊन माझा माल लुटी गेला व खंडाबाा रुपये पडले ते देणार साहेब खुदावंत आहेत. मी गरीब माझी मुले माणसे आन्नाविण उपवासी मरतात याकरिता साहेबाचे कदमापासी फार दिवस खराब होत आहे. त्यास कृपाळु होऊन माझी नुकसानी भरून देविली पाहिजे. ही आर्जी लिाा दिल्ही. सही तारीख १० माहे सपटंबर सन १८२८ इसवी. निाा कातर

¶*Butcher Kumaji applies to Governor Elphinstone that he may be re-imbursed for the loss of 2,500 goats which his father sustained during the time he was in the service of the Company.*

No. 5] *[20-11-1843*

डे. क. रु. १५५

श्री

यादी केशवराव कृष्ण जोसी सातारकर सुाा आर्बा आर्बेन मयातैन व अलफ. आमचे तीर्थरूप कृष्णराव नारायण जोसी ऊर्फ तात्या जोसी याचे वडील पूर्वीपासून शाहु माहाराज याचे पदरचे सबब पेशवे सरकारातून नवाब टिपू सुलतान बादर याजकडील वकिलीचे काम होते व पंतप्रतिनिधि याचे दौलतीचा कारभारहि होता. असी पेशवे सरकारातून वडिलाचे हातून मोठी मोठी कामे योग्यतेनरूप घेऊन शके १७०० सालात सोलापूर तालुक्यातील तीन गाव मौजे तिरे व मौजे उले व मौजे सिदखेड येकूण तीन गांव दाहा हजार रुपयाचे दिल्हे ते पुढ बाजीरावसाहेब याणी विनाकारण गांव जप्त केले. नंतर कुपणी सरकारचा आमल जाल्यावरी गांव सोडविण्याविसी अर्ज केला तेव्हा महरबान अलपिष्टन साहेब बादर याणी आमची खानदानी पूरवापार कागदपत्रां-वरून पाहून पेशवे सरकारहि चालवीत आले. त्याजवरून पेनसीन सालिना च्यार हजार रुपये करार करून दिल्हे. नंतर वडिलाचा काल जाल्यावरी आमचे नावे तेच पेनसीन करार करून दिल्हे. ते सरकार हली मेहरबानी करून देत आहे. परतु आम्हास दोघे पुत्र येक शंकरराव याची उमर वर्ष १२ दुसरे बाबूराव

याचीं उमर वर्षे १० व आमची उमर ३० वर्षे त्यास आमचे पुत्रास दुसरा आधार गुजारा चालण्यास काहीच नाही. याजकरिता सरकारानी मेहरबानी करून गाव अगरं पेनसीन पुस्त दर पुस्त करून देऊन चालविले पाहिजे. तारीख २० माहे नवंबर सन १८४३ इसवी दस्तूर लक्ष्मण बापूजी पाचवडकर निा केशवराव कृष्ण जोसी.

¶*Keshavrao Krishna Joshi prays that the pension that was granted to his father Krishnarao Narayan Joshi and which he was enjoying after him be made hereditary.*

No. 6]

डे. क. रु. ९१

श्री

कृष्णशाहा राजा जवारकर. त्याच्या बाइका दोन येक अंबाई राणी वडील धाकटी मोहनी राणी. अबाई राणीचा लेक कुवरजी. मोहनी राणीस पुत्र नाही, परतु तिणे दतपुत्र घेतला त्याचे नाव पटणशा. त्यास कृष्णशाहा मेल्यावर विसाजी केशव वसईचे सुभेदार याणी अंबई राणीला धरून वसईस आणिले. पेशव्यानी कुवरजीला वसईस पालखी व सरदारी दिल्ही. मग पुण्यास पेशवे याचे हुकुमाने तहनामा जाहाला. मोहनी राणीचा दतपुत्र पटणशा याला राज्यावर काईम केले. परंतु इतक्यामध्ये मुलूक कुवरजीचे स्वाधीन केला. कुवरजी मेल्यावर त्यास कोणी संतान नाही. पटणशा राजा होता तो मेला. त्याला तीन पुत्र वडील विक्रमशा, दुसरा यशवतराव तिसरा माधवराव. पौ विक्रमशा याला सरकारातून राज्याची परवानगी जाली, परंतु कुवरजीची बायको गौराई राणी याणी सरकारची परवानगी घेऊन येशवतराव विक्रमशाचा भाऊ यास दतपुत्र घेतले. येशवतराव मुलकाचा कारभार करीत होता. गोराई राणी मेल्यावर येशवतराव राजा जाला. तो मेला. आता दोन वर्षे जाली. त्याची बायको रमाबाई.

¶*This paper mentions several members of the family of Krishna Shah of Jawhar.*

No. 7] [*3-10-1843*

आक्टोबर १७२० ¹⁄₂ → १/२

बारामतीचें युद्ध —बंद रास दोन

श्री

यादी माधवराव दाभाडे चन्होलीकर शेना बारासहश्री सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. सन १२५३ फसली सरंजाम संपादन केला त्या मूळ

पुरुषाचे नाव सरंजाम कोणे साली मिळाला त्याची तारीख व हली सरंजाम वगैरे काय चालत आहे व अवरस पुत्र याचे नाव व उंबर वर्षे याची तुम्ही आपली कैफियत लिहून देणे म्हणौन सरकारातून सांगितले त्याजवरून येविसीची कैफियतीची कलमे खाली लेहिली आहेत ती बीा

१ सरंजाम वगैरे संपादन करणार मूळ पुरुष आमचे पणजे कृष्णाजी दाभाडे व त्याचे चुलते थोरले खंडेराव दाभाडे तलेगावकर याणी श्रीमंत शाहू माहाराज छत्रपति याजपासी येकनिष्टेने शेवा केली व मोठे पराक्रम करून कामकाजे केली त्याजवरून शाहू माहाराज याणी सरंजाम कोट पाऊणकोट रुपयाचा देऊन खंडेराव दाभाडे आमचे निमेचे वडील घर यास शेनापतीचे पद दिल्हे व आम्हांसहि दुसरे पद सेना बारासहश्रीचे दिल्हे. सरंजाम वगैरे दिल्याचे साल राजशेक शके ३० पासून शके ३९ परयंत देऊन सनदापत्रे दिल्हे ते कागदपत्र दंग्यात काही गेले. आमची मोठी दौलत होती ती त्र्यंबकराव दाभाडे व पेशवे याचे वैमनश्व आल्यामुळे लढाई होऊन त्र्यंबकराव दाभाडे लढाईत कामास आले तेव्हा दरोबस्त दौलत पेशवे यानी आटोपली. त्या अलीकडे आम्हांकडे सरंजाम वगैरे चालत आला त्याची बेरीज अजमासे पस्तीस हजाराची आहे. त्याचे माहाल व गाव होते त्यापौ काही राजपत्रे राजशक ३७ पासून आलीकडील आहेत. त्याच्या नकला हाजर केल्या आहेत. [पुढें पत्रांचा तपशील गाळला आहे.]

१ आमची वंशावळ

० खंडेराव दाभाडे तलेगावकर शेनापती थोरले त्याची वंशावल त्याजकडून लिहून येईल सबब दखल बंद

१ कृष्णाजी दाभाडे आमचे पणजे

यासी पुत्र

१ सोमाजी दाभाडे वडील

१ यासी पुत्र कृष्णाजी दाभाडे

१ यासी पुत्र बलवंतराव दत रुजू भल्हारराव

३

सदरहू त्याने आपले यादीत लिा दिल्हे आहे.

१ खंडेराव दाभाडे आमचे आजे धाकटे

१ यास पुत्र बाबूराव दाभाडे

१ यासी पुत्र माधवराव दाभाडे खुद आम्ही आमची उंबर वर्षे ५९ यासी

० मल्हारराव वडील उंबर
वर्षे १३ दत कृष्णाजी
दाभाडे आमचे चुलते
यांस दिल्हा आहे.

१ बलवतराव धाकटे उंबर
वर्षे ९

¶*This paper gives the genealogy of the second or Charholi Branch of the Dabhade family, which rose to prominence during Shahu's regime.*

No. 8] *[1844*

श्री

यादी हकीकत राजश्री खंडेराव गणेश बोढेकर इनामदार मौजे बोढे पो नासीक वगैर सुा संन आर्बा आर्बेन मयातैन व अलफ. आमचे मूळ पुरूष सिवराव शंकर हे सिलेदारीने श्रीमंत बाजीराव बलाल पेशवे याजपासी होते. तेव्हा हे सिपाई भालेकरी नामांकित, यास्तव श्रीमंताची मर्जी सुप्रसन्न होती. उपरांत दाभाडे यासीं विरुध्ध येऊन लढाई लागली ते समई उदाजी पवार यांचे बंधु आनंदराव पवार हे दाभाड्यापासीं नोकरीस होते. त्यासी बोलणे करून श्रीमंतास आणून भेटविले. नंतर दाभाडे याचा मोड जाहाला. उपरांत श्रीमंताची मर्जी खूश होऊन, आनंदराव पवार याचे दिवाणगिरीचे काम सिवराव शंकर यास सांगून आनंदराव पवार याचा काल जाहाला. त्यांचे पुत्र येशंवतराव पवार सरदारीचे काम पाहू लागले; तेव्हा पुढे काही दिवसानी पवाराचे सरदारी पौ पो आगर व पो सुनेल हे दोनी माहाल सिवाजी शंकर यांस श्रीमंतानी सरंजामास लाऊन दिल्हे. उपरांत सिवाजी शंकर याचा काल जाहाला. नंतर त्याचे जेष्ट पुत्र रंगराव हे सरदारी करीत होते. ते वेलेस कुंभेरीचे मुकामी जाटाचा छापा पडून रंगराव मारले गेले. नंतर त्रिंबकराव सिवदेव सरदारीचे काम पाहू लागले, ते समई सरकारची चाकरी करून बाराशे राउताचे सरंजामास मालवे प्रांती वगैर माहाल लाऊन दिल्हे.


येणेप्रमाणे वैवाट खंडेराव त्रिंबक याचे नावे चालली. पवाराचे दिवाणगिरीचे काम माधवराव सिवदेव करीत होते. त्याचा काल जाहाल्यावर पवाराचे सरदारीचा बखेडा जाहाला. सरदार मूल लाहान वगैर राज्यांत बखेडा श्रीमंत राघोबा दादामुळे जाहाला. उपरांत त्याचा बंदोबस्त होऊन दौलतीचे बंदोबस्त चालिले,

त्यावेळेस आमचे तीर्थरूपांचे नावे दिवाणगिरीची सनद होऊन कारभार रंगराव आपानी केला, तो शके १७२१ पर्यंत चालिला. पुढे पवारांचे दौलतीमधे येजमान लाहान, च्यार माणसे बखेडेखोर मिळाले, त्याचा बंदोबस्त आपा पाहू लागले, याजमुळे यजमानाचे आपाचे वाकडे आले. हुजुरांतून बंदोबस्त व्हावा ते न होई. कारण पुण्यातहि कारकिर्दी फिरल्या. बैदा पडला, हा समय पाहून यजमानानी तंटेबाजी करून आपास कामाहून काढिले. नंतर तीन वर्षे तसेच होते. उपरांत श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याची भेट पुणे मुकामी येऊन घेतली. तिकडील पवारप्रकर्णी मजकूर विदित केला, तेव्हा आज्ञा जाली की तुम्ही तूर्त येथे आम्हाजवळ आसावे. तुमचा बंदोबस्त करून देतो, पुढे पवार प्रकर्णी बंदोबस्त सोईसोईने करून द्यावयास येईल. असे बोलून जातीस तैनात पांच हजार रुपये व स्वारांचे नेमणुकेबाबद तीस हजार येकूण पस्तीस हजारांचा सरंजाम रंगराव आपाचे नावे करून दिल्हा; त्याची वैवाट शके १७३९ पर्यंत चालली.

¶*This is the family account of the Odhekars, the Diwans of Dhar, submitted by Khanderao Ganesh.*

No. 9] *[1816*

घ. ५०६



१ दाजी गोमाजी मृत्यु पावले [शीत अशर मयातैन]

१ तैनात जाबता राजश्री खंडो गोमाजी सुा इसने आर्बैन मया आलफ

नख्त रुपये शिवाय कापड आख

२५००

१ [सन इहिदे सबैन मया व अलफ नंतर खंडो गोमाजी याचें नांव आढळत नाही यावरून तो यानंतर वारला असवा]

१ यादी बाळाजी खंडेराव व दाजी गोमाजी व रामराव मैराळ याजकडे आसाम्या वगैरे सुाा खमस सबैन मया व अलफ

१०४६८॥ बाळाजी खंडेराव याजकडे

१०४०० माारनिलेकडे पागा आहे त्याचे

सरदारीचे वेतन रुाो

६६०० कदीम

३८०० इजाफा स्वारी हिंदुस्थान [वगैरे

३७०० दाजी गोमाजी याजकडे भिकाजी सिंदे याचे पागेची मजमू आहे. त्याचे वेतन सालिना रु.

२९०० कदीम

२७०० नख्त

२००कापड आख ९००

८०० इजाफा स्वारी हिंदुस्तान

३७००

९४४८-। रामराव मैराळ याजकडे

[पुढे तपशील]

यादी पागा दिमंत खंडेराव बलाळ पुरंदरे सुाा तिसा तिसैन मया व अलफ मौजे हा गाव दरोबस्त तीाा कैलासवासी खंडो गोमाजी आपले आजे यास बाा मुाा तैनातेत सरकारांतून दिल्हा, त्यास पन्नास वर्षे होत आली. खंडो गोमाजी यांचा काळ झाल्यानंतर आपले तीर्थरूप बाळाजी खंडेराव याचे नावे पेशजीप्राो तैनातीचा करार होऊन गाव सरंजाम चालत आला. हाली मौजे मजकूर हा गांव बाळोजी कुंजीर यांस सरकारातून देवितात. त्यास वडिलानी सरकार चाकरी येकनिष्टपणे बहुत दिवस केली. श्रीमंत कृपावंत होऊन आजपर्यंत चालविले. प्रस्तुत गावची घालमेल होत आहे. त्यास आपले वडिलानी स्वामीशेवा येकनिष्टपणें केली व आपणहि करावयास उमेदवार आहो. त्रिपुरुषांत सरकार शेवेवितरिक्त अन्योपार्जना केली नाही. यास्तव स्वामीनी कृपावंत होऊन मौजे मजकूर हा गाव पेशजी चालत आल्याप्राो चालिवणार स्वाम धणी समर्थ आहेत.

१ यादी सिवानंद बीन सहजानंद उपनाम पुरंधरे गोत्र भारद्वाज सूत्र आश्वलायेन वास्तव मौजे सिदनमट्ट पाा चितापूर

छ २८ रजब माघ मास

7570

१ यादी आनंदीबाई कोम रावो लक्ष्मण पुरंदरे कसबे सासवड सुा समानै समानीन मया व अलफ

कलमे

१ आमचा नातू महिपतराव लक्ष्मण सालमजकुरी मृत्य पावला. त्याच्या स्त्रिया दोघी आसता पोटी संतान नाही. त्यास धाकटी स्त्री उमाबाई यास पुत्र दशाहातील द्यावा यासमधे नजर . रुो ८०००१	१ महिपतराव याची जेष्ट स्त्री मथाबाई

¶*This is the genealogy of another Purandare family of Saswad.*

No. 10] *[10-3-1826*

दप्तरात दाखला पाव्हा
तारीख १० माहे मार्च सन
१८२६ इसवी.

श्रीगजानन

सरकार कुंपणी इंग्रज बाहादूर

आर्जी रघुनाथ श्रीधर भानु वस्ती मौजे आंबेगाव सन १२३५ फसली. कारणे अर्जी लिहून दिल्ही ऐसीजे. आमचे वडील गंगाधर गोविंद भानु याजकडे सरकारची कामे तालुके विजयेदुर्ग व नवलगुंद व किले लोहगड येथील सबनिसी होती. सबनिशीचे तैनातेत मौजे मजकूर हा गाव दरोबस्त होता. श्रीमंत माधवरावसाहेब कैलासवासी जाल्यानंतर श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याणी वडिलाकडील. कामे दूर करून आमचे वडिलास सिंदे याचे हवाली केले. च्यार लक्षाचे भरण्याकारिता तसदी बहुत केली त्याजमुळे मृत्य पावले. नंतर सिंदे याजकडील पलटणे व फौज लोहगड घ्यावयासी आली, याजमुळे आम्ही मुलेमाणसेसुधा पलोन उरणास गेलो. मागे आंबेगाव येथील वाडा सिंदे याजकडील लोकानी चीजबस्त जराबाजरासुधा लुटून नेले याजमुले खराबी बहुत जाली. पुढे तीर्थस्वरूप नाना फडणीस कैलासवासी जाल्यानंतर लोहगड किला सरकारात घेतला तेसमई आम्हाकडून सबनिसीचे काम दूर केले. सबनिसीचे तैनातेत गाव होत तो दूर केला. आमचे बदीस्तीची सेते मौजे सिंदगाव व

आंबेगाव येथील आहेत त्याचा सारा खडेराव रास्ते याजकडून ठरऊन घेतला ते पेशवाई आमलापावेतो चालला त्यात सदासिव माणकेस्वर याणी जबरीने दोन तीन साले वसूल घेतला. पुढे साहेबाचे आमलापासून सेताचा वसूल रुपये पावणे नवण्याव रुा तीन आणे घेतात. त्यास प्रपंचाचा निर्वाह होत नाही म्हणौन साहेबास अर्जी लिहीली आहे. साहेबी मेहरबान होऊन उपजीविका चालविली पाहिजे हे अर्जदास्त.

¶*Raghunath Shridhar Bhanu, a descendant of Gangadhar Govind Bhanu, gives his family history and requests the Company Officer to renew the allowance granted to him by the Peshwa but stopped by Sadashiv Mankeshwar.*

No. 11]

श्री

यादी माधवराव गोपाल व रंगो केशव व विश्वासराव रघुनाथ नामजाद सुभेदार प्रा मावल सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे निपणजे याचे वडील हरिपंतपरियेत विजयापूरकर पादशाहांचे पदरी आसोन त्याजकडे किला सिरवल येथील होता. तो किला श्रीमंत छत्रपति सिवाजीमहाराज याणी घेतला ते समई किल्यांत आमचे वडील आसोन त्यांनी ते समई ज्यवामर्दीने लढाई करून हरिपंत ठार जाले. हे समक्ष माहाराजा पाहोन त्याच किल्याचे काम त्याचे पुत्र शामजी हरि ते आमचे निपणजे यास सागितले व दुर्गादेवीचे काळाचे वगैरे आसीने मुलूख व किले बेचिराख होऊन बंडे जाली. सा सिरवल येथील किला व बारा मावले व किले त्या प्रांचे सुधा आमचे वडील शामजी हरि यास वतनी सुभ्याचे काम सागोन किताब सुभा नामजाद प्रा मावल म्हणौन व सिकेकटार आमचे वडिलाचे नावे व सुभे आमल वगैरे बाबती व वेतन व पालखीस गाव * * * * व सुभ्याकडे दरखदार वगैरे लवाजम आमचे वडिलास नेमून दिल्हे. नंतर आमचे वडिलानी श्वामी आज्ञेप्रो फौज ठेऊन मोठे प्रयत्नानें बंडे माडली व रयेत जमा करून मावल प्राची वसाहात करून मुलूख भर रकमेस आणोन आमचे वडील छत्रपति यांचे राजधानीचे आरंभापासून श्वामीशेवा करीत आले व त्या प्रसंगी जे लोक उपयोगी आले त्यास देणे आमचे वडिलानी दिल्हे ते आमचे सिक्याचेच आहेत. ते हली सरकार चालवीत आहेत व त्याप्रा वहिवाट वगैरे कायदे आजपरयेत आमचे वडिलानी नेमून दिल्ह्याप्रो चालत आहेत व ते काम सुरक्षित त्याजपासून आम्ही पाचवे पुस्त परयेत चालत आले. कलम

सदरहू आमचे नेक चालीवरून आमचे पणजे गोविंद सामराज सुभेदार यास श्रीमंत छत्रपति यांजकडोन श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब थोरले व नानासाहेब पेशवे याणी मागोन घेऊन पूर्वीचे काम निभाऊन नवीन कामे हिंदुस्थान प्रां किले ग्वाल्हेर वगैरे माहालचे बदोबस्ताचे पंचवीस तीस हजार फौजेचे सरजामानिसी सांगोन * * * * ते श्वामीकार्यतत्पर आसता सरकारश्वाऱ्या लाहोर व सोनपत व पथरगड वगैरे जाल्या. त्या प्रसंगी आमचे वडिलानी फौज व ऐवज मोबदलानिसी सरकारमदत केली व सोनपतचे श्वारीतून राजेश्री नाना फडणीस व खेरीज सरदार वगैरे लोक तजावजा होऊन आले त्याचा बंदोबस्त ग्वालेर मुकामी आमचे वडिलानी ठेऊन त्या लोकास इतमाम-पुरस्कर देसी पावते केले व तदेसीचे संस्थानी जाट वगैरे लोकासमागमे हामेशा लढाया जाल्या. त्या प्रसंगी ऐवजाबद्दल वगैरे सरकारांतून मदत न जाली. याबद्दल जातीवर मोबदले जाले बदल आमचा ऐवज सरकारात बहुत घेणे जाले. पैकी सरकारातून ऐवज आदा होऊन आमचे फाजील सरकारातून येणे रुा दाहा आकरा लक्ष राहिले. याप्रो आमचे वडिलाकडून मदती होत गेल्यामुळे पेशवे सरकारातून मेहरबानगी दिवसेदिवस ज्यास्त होऊन हिंदुस्थानचे कामे वगैरे आमचे वडिलापरयेत चालत आसतो. शके सत्रासे दोन यातीचे साली आमचे आजे रघुनाथराव सुभेदार वगैरे मंडली गोहदकर जाटाकडोन कुंपणी सरकारचे लढाईत कामी येऊन ग्वाल्हेरचा किला वगैरे कामे गेली व जिनगीची तजावजा होऊन फक्त बायकामुले झासीकर याणी देसी पोहचविली. नंतर राजश्री नाना फडणीस व माहादजीबावा सिंदे आमचे बंदोबस्ताविसी सरकारांत बोलता आज्ञा जाली जे तूर्त मुले लाहान पुढे त्याचा बंदोबस्त पूर्ववत केला जाईल. तो-परियंत छत्रपति स्वामीकडोन सुभा वगैर कामे चालतच आहेत व पेशवे सरकारातून * * * * चालत आहे तो व याचे फाजील सरकारात आहे त्याऐवजीं दरसाली रुपये पंधरा हजार पावतील याप्रो आमचा बंदोबस्त करून दिल्हा आणि हिंदुस्थानचे काम सिंदे याजकडे सांगितले. नंतर तो बंदोबस्त आम्हास गाव व फाजिलाबदल रुपये करून दिल्हे ते रुपये आम्हास नाना फडणीस याचे आखरपरियेत सुरक्षित चालत आले. नंतर बाजीरावसाहेब याचे काजकीर्दीत व्यत्यय आले ते बि-तपसील :— कलमे

१ मौजे रामपूर हा गाव संसार बेगमीस होता तो आमचे च्यार पुस्त चालत आला तो व फाजिलापैकी रुपये देत होते ते आमचा मागील

सिलसिला न पाहतां नाना फडणीस याचे वगैर लोभातील जाणौन बीतकसिर बंद केले कलम

१ छत्रपति याचे देणे वतनी सुभे आमल व पालखीचा गांव वगैरे सदरी लिहिले ते पांच पुस्त आम्हापरयेंत चालले आसतां कुपणीसरकारचे लढाई-पूर्वी तीन च्यार वर्षे आपाजी निंबालकर वाठारचे वगैर कारभारी सचिव याचे दौलतीत पेश होऊन सचिव यास कैद केले आणि आपण मुखत्यारीने वागो लागले. त्यास आमचे वडील आनकूल न जाहाले बदल त्या आकसाने त्याणी धटाईने सदरहू कामास वित्यय आणौन वहिवाटू लागले आणि घर वगैरे जिदगीवर उपराले केले. ते समई पेशवे सरकारात आमचे वडील अर्ज करिता निंबजालेकर त्रिबकजी डेगले याचे नसिलेदार म्हणौन दाद न लागो दिल्ही. बेबंद जालीबदल आमचे वडील मुले माणसे घेऊन परागंदा जाले. नंतर काही दिवसी सचिव कैदेतून सुटून निंबजालकर याचे पारपत्य जाले. ते समई आमचे काम आम्हाकडे यावे तो कुपणीसरकार व पेशवे सरकारचे लढाईचे हगाममुळे आमचा बंदोबस्त न होता ते काम सचिव वहिवाटितात.

२

तारीख ३ माहे दिजंबर सन १८४३ इसवी

सही विस्वासराव रघुनाथ नामजाद
सुभा प्रा मावले दा खुा

¶*Madhavrao Gopal, Rango Keshav and Vishvasrao Raghunath recount their family history, how the Subhedari of Shirval was conferred on their ancestor by the Padshah of Bijapur, how he suffered death in a battle with Shivaji who was pleased with his bravery and continued the same Watan to his son, who settled the province and administered it ably, advanced big loans to the Peshwas on various occasions. His son Govind Samraj was an esteemed servant of the Peshwa and rendered succour to the fugitive army after its defeat at Panipat. . The writers complain how their family Saranjam—Gohad etc. was wrested from them by Bajirao and asks for redress. The genealogy of the family is attached.*

7574


वंशवेल

- हरिपंत
  - गोविंद
    - हरिपंत
      - शामजी
        - +गोविंद
          - नारायण
            - गोपाळराव
              - माधवराव
                - गोपाळराव
          - रंगो
            - केशवराव
              - रंगो
                - सखाराम
              - नारायण
                - विष्णु
            - रघुनाथ
              - विश्वासराव
                - सिताराम
                - राजाराम
                - विठलराव
              - परशराम
          - रघुनाथ

+ गोविंद शामराज सुभेदार यास रामचंद्र गोविंद नांवाचा मुलगा होता असें तत्कालीन अस्सल पत्रव्यवहारावरून दिसतें. या रामचंद्र गोविंदाचा उत्तरेच्या राजकारणांत वारंवार उल्लेख येतो.

फडपोशी रु. नं. १४९

यादी वंशावळ चंद्रराव मोरे जावळीकर यांची जबानी अमृतराव बिन भीवराव मोरे



संपादकीय टीप.— वरील नकल सातारा महाराजा दप्तरांतील फडपोशी दपतर रुमाल नंबर १४५ यांतून घेतली आहे. आडव्या बंदावर एकाखालीं एक घेतलेलीं नांवें वर वंशावळीच्या रूपांत दाखविलीं आहेत. या वंशावळींतील पहिला मानसिंग मोरे–हा शाहूचा सेनापति असून तो स. १७२१ च्या सुमारास वारला.

नंतर त्याचा सरंजाम मुलगा आनंदराव याजकडे चालला. आनंदराव स. १७६७ च्या पूर्वी वारल्यावर त्याचा पुत्र भीवराव याचे नांवें असामी चालली. भीवरावाचा मुलगा कमळोजी पेशवाई अखेर हयात होता, अशी माहिती कागदांत मिळते.


चंद्रावाचा नातू यशवंतराव हा पुढील वंशावळींत दाखविलेला मूळ पुरुष असावा.

* कृष्णराव यशवंतराव याचा पुत्र यास पुढें लग्नाचे बायकोचा वंश नाहीं. दुसरे बायकांचा वंश आहे.

¶*This and the following tables of the family of the Mores would be found useful in constructing a history of that family, as it gives several names and their relationship about the year 1827.*

श्री

वंशावळ भगवंतराव बिन हैबतराव मोरे पाटील मोकासी मौजे साईकडे पो। कोळे प्रांत कराड. मूळ पुरुष यशवंतराव मोरे



१८

+ या नांवांखालीं 'हजीर आहे', असा शेरा आहे. सदरहूप्रमाणें मूळ पुरुषापासून ह्यापो विस्तार आहे. जे वडील मेले ते स्वामीकाजी मेले याचा तपशील:—

१ कृष्णराव बिन यशवंतराव याणी आपले काळकीर्दीस+ पांचगांव मोकासा व इनाम जमिनी व पाटीलकी मौजे मजकूरची खरीदी घेतली. गाव मोकासा जमिनी श्रीमनमाहाराज कैलासवासी शाहूराजे छत्रपति याची सेवा करून मेळविले त्याच्या सनदा आहेत.

१ याची बायको रखमाबाई खासी होती तिचे पोटी संतान नाहीं. दुसऱ्या आमच्या मातुश्री दोघी होत्या त्याचे पोटी आमचे वडील—

१ बुधिवतराव	१ सोनजीराव व मुकुंदराव
येकीचे पोटी येकच	येकीचे पोटी

हे दोघे मुले रखमाबाईने थोर करून बीषवर्ष कारभार केला. मग दौलतीचे काम करू लागले. नंतर बाईचा काळ जाहाला. तिला साडीचोळी श्रीपतरायापासी जमीन ८१० मौजे मारूळ येथे मिळविली ती आद्यापि चालत आहे.

१ आमचा वडील मुकुंदराव बिन कृष्णराव याणी कृष्णरायाचे थडे बांधावयासीं रा श्रीपतराव पंतप्रतिनिधि याजपासून जमीन मिळविली ती आद्यापि चालत आहे. ते मुकुंदराव मारानिल्हे रा भाऊसाहेब पेशवे याजबार पाणपथावरी पडले.

१ आपाजीराव बिन बुधिवंतराव यांणीं तादुळज्याचे लढाईत दादासाहेबापासीं पडले.

१ दामाजीराव बिन सोनजीराव हे स्वामीकाजी बोरघाटचे लढाईत पडले.

१ रखमाजी बिन सोनजीराव हे बदामीचे लढाईत तोफेच्या गोळ्यानें उडाले.

१ सोनजीराव बिन कृष्णराव हे श्रीरंगपट्टणचे मुलुखगिरींत मेले.

१ आमचा घोडा होळकर याचे लढाईत रा बाजीराव सा याचे लढाईत पडला.

या प्रमाणे स्वामीकाजी आमचे वडिलांनी देह खर्चिले आहेत. आमचे मोकाशाचे गांव व जमिनी व पाटिलकी कृष्णरायापासून आज चार पांच पिडी अनभवीत आलों. यांत कोणहाचा वितला इलाखा नाही.

१ कृष्णराव याचे पुत्र

१ बुधिवंतराव याचे पुत्र

१ दाजीराव याचा पुत्र

१ बुधिवंतराव हजीर आहे.

सदरहू पांच पिडी वडिलांचे वडिलांपासून अनभवीत आहों.

+ असें अक्षर आहे.

[22-6-1827

श्री

यादी भगवंतराव बिन हैबतराव मोरे मोकासी पाटील मौजे साइकडे ता। कोळे प्रांत कराड सु।। सन समान आशरीन मयातैन व आलफ. वंशावळ बितपसील

- मूळ पुरुष यशवंतराव
  - कृष्णराव
    - बुधिवंतराव
      - आपाजीराव पानपतावर बुडाले नकल जाहाली
      - हणमंतराव
        - दाजीराव
          - बुधिवंतराव
    - मुकुंदराव
    - सोनजीराव
      - हैबतराव
        - भगवंतराव
      - सुभानराव
        - महिपत
        - आनंद
        - भाऊराव
        - नानाराव
      - दामाजीराव
      - रखमाजी
      - माधवराव
        - गणपतराव

सदरहूप्रमाणें आमचे मूळ पुरुषापासून आज ता। विस्तार आहे. यांत स्वामीकाजी आमचे वडिलांनीं व आम्ही देह झिजविले, व खतम जाहाले तपशील:—

कृष्णराव मारनिल्हे याणी पांचगाव मोकासा राजपत्र व इनामजमिनी राजपत्री व मौजे साइकडे मार ग्रेथील पाटीलकी खरेदी घेतलीयाचे दाखले सनदा व दुमालपत्र व वहिवाटीचे पत्रे व पाटीलकीचे महजर करून घेतले ते आम्हापासून

गफलत करून चोर घालून आमृतराव मोरे याणे नेले त्याची चौकसी करून कागदपत्र माघार साहेबानी घेऊन सरकारांत ठेविले आहेत. मूळपुरुषापासून गावमोकासा व इनाम व पाटीलकीची वहिवाट आम्हीच करीत असतां नवीन खटले आमृतराव मारनिल्हे यांणीं करून खराबा केला आहे. यांची चौकसी करणार धणी दीनदयाळ. हे वंशावली लिहून दिल्हे सही. मिति जेष्ट वा। १३

हा। व्यंकोबा सोनार जोतिष कुळकर्णी
मौजे फोडसिरस पा। दहिगाव.

No. 13] [*16-10-1843*

श्री

यादी जनार्दन नीलकंठ व गोपाल अनंदराव सुपेकर दि। पुरंदरे सन १२५३ फसली. आम्ही माहाराज छत्रपति यांच्या शेवा केल्यावरून छत्रपति व पेशवे सरकार यांचे आज्ञेवरून पुरंदरे यांचे तैनातीस मुतालीक दिवाणगिरी आम्हा दिल्ही. त्याप्रमाणे आमचे वडिलानी दिवाणगिरीचे काम केले. त्याबा। वेतन पुरंदरे यास तीन लक्ष रुपयांचा सरमजाम पतकाचे खर्चास होता त्यापा। आम्हास सरकारचे तैनात जाबत्यापा। दाहावीस हजार रुपये पावत होते व * * * सदरी लिहिलेले गाव आम्हाकडे सन १२२७ लढाईआखर चालत आले. पुढे कुंपणीसरकारचा आमल जाहाला तेव्हा आम्ही आपले बंदोबस्ताविसी याद देऊ लागलो. तेव्हा श्रीमंत आबासाहेब पुरंदरे यानी आम्हास सांगितले की, आम्ही आपले व सर्वत्राचे बंदोबस्ताविसीं कुंपणीसरकारात याद दिल्ही आहे, त्यात तुमचे नाव दाखल केले आहे. आमचे बंदोबस्तावर तुमचाहि बंदोबस्त होऊन येईल. त्याजवरून आम्ही प्रथम याद दिल्ही नाहीं. अबासाहेब यास सरकारातून साठ हजार रुपयाचा सरमजाम दिल्हा तेव्हा अबासाहेब याणी साठ हजार रुपयाचे अन्वये आम्हास खर्चास देऊन परामृष करीत आले. त्यानंतर आबासाहेब कैलासवासी जाले. पुढे त्यांचे चिरंजीव माधवराव नीलकंठ पुरंदरे याणी आपला सरमजाम चालविण्याविसी कुंपणी सरकारास अर्ज केला. त्या यादीत आमचे नाव पूर्ववत-प्रमाणे दाखल करून आम्हास घरास जाण्याचा निरोप देऊन तोंडजबानी सांगितले की, तुमचा बंदोबस्त आमचे बरोबर होऊन येईल, ते वेळेस तुम्हांस सूचना करू. ऐसे सांगितल्यावरून आम्ही घरास गेलो. पुढे लोहगड मुकामीं बायांचा व नवीन कारभारी यांचा व पुढे यजमानसुध्धां बंदोबस्त जाला. आणि यादीत आमचे नाव लिहिल्याप्रमाणे आमचा बंदोबस्त जाला नाही. कारण नवीन कारभारी यांचा

देखील करून दिल्हा. त्याजवरून असे वाटते की, नवीन कारभारी याणीं आमचे नावावर आपलाले बंदोबस्त करून घेण्याकरिता आम्हास भरवश्याची थाप देऊन आमचे नाव अजीच गाळले. तेव्हाच आम्ही सरकारांस अर्ज करावा, परंतु आमचे तीा मयत जाले या कारणाने तसेच राहिले. त्यास, पुरंदरे यांचे पदरी आमचे बराबरीचा कोणी नाही व आमची मातबरी कोणत्या रीतीने व आम्हांस सरमजाम काये व छत्रपति व श्रीमंत पेशवे सरकार आम्हांस कसे मानीत आले, हे सर्व कागद आमचेपासी आहेत. ते सरकारानी पाहिले म्हणजे खचित सरकारास वाटेल की, ही गोष्ट चुकून राहिली व खांदानीचा मजकूर सरकारास रोशन होईल. व पेशवे सरकारचे दप्तरचे दाखल्यावरून पुरंदरे याजकडे ऐसी पंच्यैसी वर्षे चाकरी करून पुस्त दरपुस्त लढाईत उपयोगी पडत गेलो. व टिपू सुलतान याजवर सरकारानी आम्हास पाठविले त्याप्रमाणे ती श्वारी सर करून सदरी सरमजाम व गांव लिहिले, याखेरीज टिपू सुलतान यांनी पाच हजार रुपयाचे गाव इनाम करून दिल्हे. तेव्हा आमचे वडिलानी विच्यार केला की, पेशवे सरकार यानी आपल्यास काही कमी केले नाही. साा ते गाव ब्राम्हणास आग्रहर करून देऊन पत्रे करून दिल्ही, ते प्रमाणे त्याजकडे चालत आहे. त्यास पेशवे सरकार हे आमचे पुस्त दरपुस्त बंदोबस्त करीत गेले आणि हाली पुरंदरे यांचे कारभारी यानी आपलाले बंदोबस्त करून घेण्याकरिता अजी आमचे नाव गाळून आपले कार्य संपादन केले. त्यास ही गोष्ट चुकून राहिली असी खात्री सरकारानी कागदपत्र पाहिली म्हणजे होईल. याजकरिता सरकारास अर्ज केला आहे. तरी आमचेपासी सरकारचे कागद आहे ते व पेशवे सरकारचे दप्तरचे दाखले पाहून बंदोबस्त प्रथम करून द्यावा. आगर पुरंदरे यांचा बंदोबस्त जाला आहे त्याअन्वये त्यानी आमचा बंदोबस्त करून द्यावा आणि सदरी लिहिलेले गाव लढाईआखर आम्हाकडे चालत आल्याप्रमाणे आम्हाकडे चालवावे. कारण लढाई जाल्यादिवसापासून सरकारचा पैसा येकदिखील मिलकत नाही. आणि कुटुंबाची माणसे तीसच्यालीस; दुसऱ्याचे कर्ज बहुत जाले. त्यास, या संकटातून काढण्यास सरकारावाचून वाली नाहीं. त्यास मेहरबानी करून बंदोबस्त करून देविला पाहिजे.

आमची वौशावळ :

संपादन करणार, हरि गोपाल व आनंद गोपाल.

१ हरि गोपाल, यास पुत्र	१ आनंदराव गोपाल, यास पुत्र
१ बलवंत हरि, यास पुत्र	१ गोपाल आनंदराव, उमर वर्षे ६०
१ नीलकंठराव बलवंत, यास	हली जिवंत.

१ जनार्दन नीलकंठ, यास
  पुत्र च्यार व त्याची उमर ४९
  १ गणेश जनार्दन, उमर २९
  १ खंडेराव, उमर २०
  १ रामराव, उमर १८
  १ लक्ष्मणराव, उमर १०

———

  ४

येकूण वौंश व याखेरीज कुटुंबाची माणसे आहेत. त्यांस आम्ही कुटुंब-वछल, सा बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे. ता १६ माहे आगटंबर सन १८४३ इा.

सही: जनार्दन नीलकंठ व गोपाल आनंदराव
दस्तुर जनार्दन नीलकंठ.

¶*This is a family history and genealogy of Anandrao Gopal Supekar Deshpande presented by his descendants Janardan Nilakanth and [Gopal Anandrao.*

No. 14] [*27-11-1843*

श्री

यादी त्रिंबकराव बिन माहादजी सोनवणी चाबुकस्वार दिमत हुजूर पागा निा पेशवे सरकार सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे वडील श्रीमंत सवाई माधवरावसाहेब याजपासी होते. ते श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब कोपरगाव मुकामी होते, त्यास घोड्यावर बसावयास सिकविण्या-करिता कोपरगावी सरकारातून पाठविले. तेथे जाऊन श्रीमंत बाजीराव-साहेब यास घोड्यावर बसावयाचा अभ्यास करविला आणि तेथेच नेमणुकेस होते. श्रीमंताची स्वारी पुण्यास राज्यावर आली, त्या समई आमचे वडील बराबरच होते. नंतर स्वारी होलकर दंगा जाहाल्यावर वसईस गेली. बराबरच वडील होते. तेथे सरकार आज्ञेप्रो कामकाज करून पागाचे घोड्याचा बंदोबस्त राखीत होते. त्याजवर वसईहून स्वारी पुण्यास आल्यावर आमचे वडिलास जातीचे तैनातेबदल गाव सुा सीत मयातैन शके १७२७ सन १८०९ सनदा करून दिल्हा तो गाव इग्रजी आमल होणेपावेतो आमचे वडिलाचे नावे चालत आला. पुढे मेहेरबान आलपिस्तन साहेब बाहादूर गौरनर याणी सर्वांचे बंदोबस्त केले ते

समई मी व आमचे वडील ब्रम्हवर्तास स्वारीबरोबर गेलो तेथे होतो. तेथे आमचे वडिलास देवआज्ञा जाहाली. नंतर श्रीमंताची आज्ञा घेऊन पुण्यास आलो

ताा २७ नवंबर सन १८४३ इा

सई माहादाजी रघुनाथ ठोसर मेहेरबान ज्यान वारडीन-साहेब बाहादूर याचे हुकुमाने सई केली असे दस्तुर खुद.

¶Trimbakrao Mahadji Sonavani, a Maratha by caste, mentions the loyal services of his father as a riding master to Bajirao II and the gift of a Saranjam conferred on him by the Peshwa.

No. 15] *[24-11-1843*

श्री

यादी दौलतराव बिन संताजीराव लाड मौजे वाटार बुा.पाो सिरवल सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे पणजे कैलासवासी व्यंकटराव लाड हे श्री-राजा शाहू छत्रपति याजपासी चाकरीस राहिले. पुढे हरहमेशा लढाईचे कामात बहुत वेला मर्दुमी करून शेवा येकनिष्ठपणे केली. त्याजवरून छत्रपति याणी मौजे मिलवडी येथील मुकासा व किले चंदनवंदन येथील हावाला हा आधिकार दिल्हा. त्याप्राो वहिवाट चालत असता दरम्यान आमचे पणजे व्यंकटराव, माहा-राजांची आज्ञा घेऊन, मुलालेकरेसुधा श्रीमाहायात्रेस गेले तो तिकडेच त्यांचा काल जाला. त्यांचे चिरंजीव जानोजीराव हे आमचे आजे देसी यऊन श्रीमंत कैलास-वासी नानासाो पेशवे यास भेटून, पूर्वी छत्रपतिकडोन मुकासा व गला नेमणुकी वगैरे चालत आल्याची विनंती केल्यावरून, पूर्वी चालत आल्याप्राो चालविण्यासी सनदा जाहाल्या. परंतु ते कागदपत्र दंग्याधोप्यात गाहाळ जाले. परंतु काही आलीकडील कारकीर्दीतील कागदपत्र आम्हापासी आहेत ते बिा:

* * * * * * * * *

येणेप्राो सरंजाम व नख्त पोतापाो दरमाहा रुा १०० शंभर चालत आसता, दरम्यान त्रिंबकजी डेंगळे याणी काही आदावतीमुळे सरंजामाकडे चालत होते त्याचे वसुलास हरकत केली. सा पुन्हा श्रीमंतांचे कानावर घालून बंदोबस्ताची आज्ञा घेतली. परंतु त्या संधीत कुंपिणीसरकारची व पेशवेसरकारची लढाई होऊन, कुंपिणीसरकारातून सर्व पेशवे यांचे पदरचे मंडलीचा बंदोबस्त जाहाला. त्याजबरोबर सरकारनी आमचा सरंजाम बाहाल न करिता, तीनसे रुा सालीना

पेंनसन छ. १ ज्यानेवारी सन १८२० रोजी करून दिल्हे त्याप्रो साल दरसाल सरकारातून यैवज मिळत आहे. परंतु त्याजवर निर्वाह होत नाही. आमचे बरोबरीचे माणकोजी सिंदे कोपर्डेकर व दौलतराव बापू घाटगे वगैरे याजकडे जातीस सरंजाम चालत होता त्याप्रमाणे नख्त नेमणूक सरकारानी चालविली आणि आमचे सरंजामाचे उत्पन्न वगैरे न पाहाता तीनसे शो करून दिल्हे. यास्तव आमचा अर्ज असा आहे की, पेशजी पेशवाईत चालत आल्याप्रो, कागदपत्र, सनदा वगैरे पाहून, आमचे आम्हाकडे चालविणेविसी तजवीज जाली पाहिजे. आम्हास उमर वर्षे साठ व आम्हास पुत्र च्यार; त्यात वडील आनंदराव, यास उमर वर्षें च्यालीस. व सदरहू तीनसे रुपये पेनसिनासिवाये दुसरे उत्पन्न कांही नाही, यास्तव पुढे मुलालेकरासुधा निर्वाहा हुर्मतीने व्हावा येविसी कृपा करणार खावंद समर्थ आहेत. तारीख १ जिलकाद माहे नवंबर

सही : दवलतराव लाड दस्तुर खुद.

¶*Daulatrao Lad submits an account of his family saying that a saranjam was granted to his great grandfather by King Shahu for his loyal services and that the same saranjam was continued for a long time by the Peshwas. The writer adds that the annual pension of Rs. 300 granted to him by the Company in return for the saranjam is quite inadequate and therefore prays for an increase of the same.*

No. 16] [17-9-1843

नंबर १२८९

श्री

यादी नारो मोरेश्वर भागवत वा पुणे पेठ शनवार घर खासगत सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे आजे कैलासवासी धोंडभट भागवत यास पेशवे सरकारातून सरंजाम होता तो पेशवे सरकार अखेर चालला. पुढे कुपणी सरकारचा अमल जाल्यावर रघुनाथ धोंडदेव याचे नावे सरंजामाबाा सोळासे रुपये सन १८१९ साली मुकरर केले ते सन १८२१ पर्यंत चालले. पुढे ते मृत्य पावले आणि बंद जाले, तेव्हापासून आम्ही सरकारास अर्ज बहुत केले; परंतु कांही बंदोबस्त जाला नाहीं. साा हली आम्ही आपला मार सरकारास जाहीर करतो.

१ आमचे आजे कैलासवासी धोंडभट भागवत यांस श्रीमंत कैलासवासी सवाई माधवरावसाहेब याणी बोलाऊन नेऊन सांगितले की तुमची कन्या श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यास द्यावी. असे सांगितल्यावरून कन्या श्रीमंत

---

१ अग्रूनें.

बाजीराव साहेब यास दिल्ही. सके सत्रासे साहा साली लग्न जाले. नंतर कैलासवासी रावसाहेब याणी कैलासवासी नाना फडणीस यास सांगितले की भागवत यास पुणे मुकामी आणून त्याचा बंदोबस्त चांगला करून द्यावा. त्याजवरून तैनात जाबता सालीना रुपये तीन हजार व कारकून आा १ व सिपाई आा ६ व घोडी दोन असी नेमणूक करून पुणे मुकामी आणून राहाण्यास वाडा सरकारातून देऊन ठेविले. त्याप्रो शके १७१७ पर्यंत चालले. रावसाहेब कैलासवासी जाल्यावर श्रीमंत बाजीराव साहेब गादीवर आले. नंतर कैलासवासी नाना फडणीस याणी विनंती करून दोन हजार ज्याजती तैनात व कदीम तीन हजार येकूण पाच हजार रुपये करून दिल्हे त्याप्रमाणे पोताहून पावत होते. नंतर बाजीराव साहेब याणी नख्त तैनात पावत होती त्याबाा व कारकून शिपाई व घोडी याबाा येक हजार रुपये ज्यास्ती ठराऊन साहा हजार रुपयाचे गाव देहे तीन लाऊन दिल्हे.

पुढे कुंपिणी सरकारचा अमल सुरू जाल्यानंतर सर्व सरदार व आप्तमंडली व दरकदार वगैरे सर्वांचे बंदोबस्ताची तजवीज होत होती ते समई आमचे आजे धोंडभटजी यास देवआज्ञा जाली. पुढे रघुनाथ धोंडदेव याचे नावे सोळासे रुपये करून दिल्हे. त्याप्रो अजमासे दोन वर्षे चालले. पुढे ते मृत्य पावले आणि बंद जाले.

¶*Naro Moreshwar Bhagvat laments that the pension of 1,600 granted to his uncle by the Company has been stopped since his death and prays for its renewal and in support of it mentions the claims for his saranjam based on the high relation subsisting between his family and that of the Peshwa, the daughter of his grandfather having been married to Bajirao II in the year 1784.*

No. 17] *[2-10-1822*

ए रु. १९

तारीख २ अगटोबर सन १८२२

श्री

अर्जी श्रीपत रघुनाथ भोवालकर काा वोतूर प्रांत जुनर सुाा सलास अशेरीन मयातैन व आलफ. आमचे वडील रामाजी यादव यास पुत्र चौघे, पैकी माहादाजी राम याचे नकल, बाकी पुत्र तिघे, त्यापौ (आ)म्ही खडो राम याचे नातू व महिपत मल्हार केशो राम याचे नातू व धोंडो राम यास पुत्र नाही. सबब त्यानी परगोत्रीचा

सदासिव जयराम तटू कुलकर्णी का नारायणगावकर याचा मूल दत घेतला. त्याचे नाव गोपाल धोंडदेव ऐसा त्रिवर्गाचा वंश आहे. येकवटपणा असता सरकारांतून धोंडो राम याजकडे नवाब बाहादूर याजकडील वकिली होती, याजमुले सरंजामाचे गाव दोन दिल्हे ते चालतच होते. व मोगलाईतून बी(ड) प्राचा गाव मौजे राजापूर जाहागीर सोंहनक दिल्हा तोहि चालतच असता धोंडो राम याची नादनूक तेथच होती. तेथून इकडील सरंजामाचे गावची वगैरे वहिवाट करून सर्वत्राचे चालवीत होते. धोंडोराम याचा काल जाहालियावर गोपाल धोंडदेव सरंजामाचे गावची वहिवाट करून वडिलाप्रो पूर्ववत चालवीत असता श्रीमंत बाजीराव साहेब यानी दोन्ही गाव जफ्त केले. तेव्हा गोपाल धोंडदेव राजापुरी व आम्ही मोगलाईत कामाकाजामुले मुलामाणसासुधा होतो. गावी केशो राम होते. त्याजपासी सरंजामाचे गावच्या सनदा वगैरे कागदपत्र येकवटणाचे वेलेचे होते ते त्याचे नातू महिपत मल्हार यानी सरकारात वडिलाचे वेलेच्या (स)नदा वगैरे कागदपत्र दाखऊन गोपाल धोंडदेव याचे नावे गावची मोकलीक करून घ्यावी ते न करिता धोंडो राम संमधी आपमतलबाचा मजकूर गैरवाका समजाऊन दोन गाव पौ मौजे माहारण ताा वोतूर प्रांत जुनर हा गाव आपले नावे मोकला करून घेतला. पुढे आम्ही गावी आलो. महिपत मल्हार यासी गावसंमधी माार पुसला, त्यानी सागितला. तेव्हा आम्ही बोलिलो की गावचे उत्पन्न तुम्ही व आम्ही उभयेतानी घेत जावे. गोपाल धोंडदेव येतील ते काली त्यास हिसाप्रो देऊ. ऐसे बोलणे जाल्यावरून त्यानी सागितले की, दरबार खर्च थैवजी गाव सावकारास लाऊन दिल्हा आहे. सावकाराचे रदकर्ज जाहाले म्हणजे वडिलोपार्जित गाव यामुले येथात्रिभागे गावचे उत्पन्न घेत जाऊ ऐसे बोलणे जाहाले. नंतर सावकाराचे रदकर्ज * * जाहाले आणि सनदेअन्वये साहेबाची सोडचिठीहि जाहाली. त्या तागाईत आम्ही आपले त्रिभागाचे उत्पन्न गावचे मागत असता आम्हास देत नाही. जबरीने गावचे उत्पन्न दरोबस्त महिपत मल्हार नेतात. त्यास साहेबी कृपाळु होऊन येविशई दरयाफ्ती होण्यास हुकूम होऊन आमचा हिसा आम्हास ताकीद करून देविला पाहिजे. साहेबासिवाय आम्हास त्राता कोन्ही नाही.

¶*Shripat Raghunath Bhowalkar submits his Kaifiyat and says how the inam was granted to his father Ramaji Yadav and how it was appropriated by one Mahipat Malhar (one of his family). The writer requests that instructions should kindly be issued to Mahipat Malhar asking him to allow the writer his share in the watan. The paper supplies useful family history of Dhondo Ram Peshwa's agent at the Nizam's Court.*

+ A Grant of rent-free land for subsistence.

7587

मेहेरबान येज्यंटसाहेब बाहदूर जिल्हा दक्षण यादी नारो गणेश वोक राहाणार कसबे वरसई प्राा सांकसे जिल्हा ठाणे व शहर पुणे पेठ बुधवार घर खाा कारणे याद देतो ऐसीजे. आमचे चुलते राघो हरि हे पूर्वी पेशवे सरकारचे दप्तरांत कामावर होते. मर्द माणूस हुशार पाहून पागापतकांची सरदारी दिल्ही. व ते वारले. त्यांचे कनिष्ठ बंधु येसाजी हरि यांचे नावे सरकारानी पागापतकांची सरदारी चालविली. लाहानमोठी कामे यथाशक्त्या घडली. नंतर कितूरचे लढाईत खासे येसाजी हरि व फडणीस गोविंद हरि करमरकर सरकारकामास आले. उभयेतांसहि पुत्र नाही. यामुळे उभयेतांचे बंधूंचे नांवे इनाम जमीन बिघे ४५ पंचेतालीस साडेच्यारसे रुो आकाराची करून दिल्ही ती विाो

३०० जमीन बिघे ३० गणेश हरि वोक याचे नांवे

१५० जमीन बिघे १५ चिमणाजी हरि करमरकर याचे नावे

———

४५०

येणेप्राो आकाराची नेमून दिल्ही ती आजपरियंत चालत आहे. आमचे चुलते येसाजी हरि लढाईत गुजरलेनंतर कनिष्ठ बंधु गणेश हरि म्हणजे आमचे तीर्थरूप यांचे नावे पागापतकांची सरदारी दिल्ही, ती पेशवाईआखेर चालत होती पागेकडे गाव पाचच्यार होते * * * * * * * * * हा गांव साहा हजारांचा लडाईआखेर चालत होता. नंतर सरकारानी गाव घेऊन नेमणूक दर सालीना रुो १५०० पंधराशे सन १८२० इसवी सालापासून चालू केले ते सन १८४६ पावेतो जिल्हा पुणे येथील खजिन्यांतून मृगसालास येकवेल पावत आले. नंतर आमचे वडील गणेश हरि हे ताा २० मे सन १८४७ साली वारले. त्यांस पुत्र दोघे. वडील हरि गणेश हे तीर्थरूप असतांच अगोधरच दोन वर्षे वारले. त्यास पुत्र येक. त्याचे नाव विष्णु हरि. याचे वय सुमारी पंचवीस वर्षाचे आहे. व आम्ही नारो गणेश दुसरे. आमचे वय सुमारी चालीस बेतालीस वर्षाचे आहे. व आम्हासहि पुत्र आहे. याप्राो आम्ही व आमचे पुतणे विष्णु हरि याचे मातोश्री सुाा सर्वत्र येके ठिकाणींच आहोत. वडील गणेश हरि वारिले, त्यांचे पाठीमागे हयात तारखेपरियंत आम्हांस सरकारानी ऐवज दिल्हा. पुढे आमचे मुलाबाळांचे चालवणे सरकाराकडेसच आहे. आम्हांस सरकारचे कदमासिवाय आश्रय नाही. सबब, अजपरियंत वडिलांचे सरकारानी चालविले त्याप्राोच चालऊन प्रतिपाल करणार सरकार समर्थ आहेत. व आम्हांस येक पुत्र, त्याचे नाव धोंडो नारायण. याचे

वय सुमारी बारातेरा वर्षाचे आहे. ऐसियास, आमचे पुतणे विष्णु हरि व आम्ही सर्वत्र येके ठिकाणीच आहोत. यास्तव पूर्वीप्रमाणे नेमणूक आमचे नावे सरकारानी चालविली असता आम्ही आपसांतील खिशांचा बोभाट सरकाराकडेस येऊ देणार नाही. ही याद लिहून दिल्ही, सही ता। ६ माहे मे सन १८५१ इसवी.

सही :—नारो गणेश वोक यांचे तर्फे

कारकून नारो चिमणाजी करमरकर.

¶*Naro Ganesh Ok recounts the loyal services rendered to the Peshwa by his uncles Ragho Hari and Yesaji Hari who were given a saranjam in return. The saranjam was taken over by the Company and a pension of 1,500 Rs. was sanctioned. The writer prays that the same pension should be continued to him and his brothers jointly.*

No. 19] [*9-10-1843*

श्री

यादी पांडुरंग आनाजी काले शहर पुणे पेठ बुधवार सन १२५३ फसली कारणें. आमचे तीर्थरूप आबाजी माहादेव काले हे श्रीमंत दादासाहेब पेशवे याजवल चाकरीस सुा। सबा सबैन ११७७ शके १६९८ सन ११८६ फसली या साली राहिले. त्यास श्रीमंतानी हे काम करणारे हुशार व इमानी असे ध्यानात आणोन तोफखान्यांचे कामाची म्हणजे तोफा वोतणे व दारू तयार करणे व पलटणची तयारी इत्यादिक आभ्यास व्हावा याजकरिता श्रीमतानी इंग्रजसाहेब लोक नौकर या कामाकरिता ठेऊन त्यांचे हातून सर्व विद्याभ्यास करविला. नंतर श्रीमंताबरोबरच तलेगाव वगैरे प्रसंगात होते. तेव्हा याचे दिमतीस पलटणचे काम असून लढाई दिल्ही आणि तसेच श्रीमंताबरोबर मुबईस व सुर्तेस गेले. नंतर सुर्तेस रक्ताचा व आग्नीचा पाऊस पडला व वारा मोठा सुटून घरे उडाली. त्यासमई तेथेच होते. पुढे श्रीमत दादासो कोपरगावी शके १७०५ सुा। आर्बा समानीन ११८४ सन ११९३ फसली साली आल्यानंतर आमचे वडिलास हरिपंत तात्या फडके याजबरोबर गादीचे चाकरीस राहाण्याविसी पाठविले आणि सांगितले की आबा काले याणी आम्हापासी बहुत इमानेइतबारे येकनिष्टेने शेवा चाकरी केली. विश्वासुक आहेत. याजविसी बालाजी जनार्दन फडणीस यास सागून याचे उतम प्रकारची योजना व्हावी. त्याजवरून फडणिसानी थोडे लोक याचे दिमतीस देऊन श्रीमंतापासी हुजूर राहाण्याची योजना केली. पुढे बदामीचा किला घेण्याकरिता पेशवे सरकारातून फौज नाना फडणीस याचेबरोबर

7589

नेमली, त्यात आमचे वडिलाची योजनाहि केली. त्याणी किला घेण्याचे कामात बहुत मेहनत व सिपाईगरी करून आपले लोकासुा आघाडीस वाढून हला केला. त्या प्रसंगांत गोलीची जखम तोंडावर लागली. तेव्हा किला सर जाल्यावर आमचे वडिलाचा मोठा सत्कार करून चौरी आबदागिरी इत्यादिक मोठेपणाचा दरज्या वाढविला व निसबतीचे लोकाचा शेरा चौदा रुा करून आम्हांस तैनात हजार रुा खेरीज शागीर्दपेशा वगैरे करून दिल्हे. शके १७०८ व ते वेलेपासून श्रीमंत सवाई माधवराव सो याचे संनिध म्हणजे जेथे श्रीमंताची स्वारी काही कारणपरत्वे परवतीस वगैरे ठिकाणी गेल्यास तेथे चौकीपाहारे व पलटणी लोकाचा बदोबस्त आमचे वडिलानी जाऊन करावा याप्रो वहीवाट सवाई माधवराव अखेर चालली. पुढे श्रीमंत राजश्री बाजीराव सो राज्यारूढ जाल्यावर त्याणी आपले वडिलाचेपासी शेवाचाकरी केली व मर्द माणूस असे ध्यानात आणोन आम्हास कामे सांगितली ती बीा व त्या कामाबद्दल व खासगी खर्चाबा पावत होते ते बीा

१५०००० शहर पुणे येथील चौकीपाहारा व गस्त वगैरे बंदोबस्ताचे काम होते. त्यास खर्च शहरचा वसूल व जकाती काा ऐवज व वराता मिलत होत्या ते सदरी

७५००० शनवारचे वाड्यातील चौकीपाहारे सुा दरवाज्यावरील बंदोबस्ताचे काम होते त्याबा खर्चास वरातावर मिलत होते ते सदरी रुो

३००००० सिवाय दुसरे पलटणचे लोक व आरब व हेटकरी वगैरे लोकावर जाबता ठेऊन काम घेणे त्याचे बाा खर्चास मिलत होते ते वरातावर वगैरे देत होते ते सदरी रुो

३३६००० खासगी पलटणे दोन गाड्याची होती त्याजबा ऐवज वराता व सरंजाम मिलोन पावत होते ते व बाणदार पलटणात बाा

६१९५५।।। वराताचा ऐवज रुो

२७४०४४। सरजाम गावगना वगैरे किरकोल जतीचे गाव फुटकल याजवर मिलत होते ते रुा

३३६०००

५०००० तोफखाना श्रीमंत दादासो याजकाा भांबड्याचा होता त्याजबा खर्चास वराताचे येत होते ते सदरी

१४२०५ खासगीचे तैनातेस पालखी व आबदागीर शागीर्दपेशा वगैरेचे खर्चाबा पावत होते ते बीा

१२०५ पालखी आबदागीर मिळोन येकसाला आड मिळत होते ते वराता वगैरे

२०५ पालखीचे सामान व आबदागीर
१००० भोई यास रोजमऱ्याबा येकसाल

१२०५

१२००० जातीचे तेनातेस

कुपणीसरकारातून वकील मालीट सोचे पुढे करणेल पालरम व कर्णेल कलोष वगैरे जे बेटावर येत होते त्याची भेट होणे असल्यास आबाचे इतल्याखेरीज होत नवती. याचा दाखला इंग्रजी बुकावरून असेलच व वोतूरच पलीकाा स्वदेशच्या पाा भिलाचा तीन बाऱ्याचा बंदोबस्त लोक पाठऊन तहनामे करून चौकश्या केल्या असा बंदोबस्त केला आहे. त्यात लढाई वगैरे जाली. पुढे नाना फडणीस वारल्यावर वाड्यात आरब होते त्यासी व होलकर याचे आरब होते त्यासी लढाई करून पुढे बाहेदारी देऊन कारकून जमादार देऊन पुण्याबाहेर काढून दिल्हे. कलम

येणेप्राो कामे करीत होते. सबब सिवाय कामकाज मुख्यत्वे पाहाणे असे सागून जातीस तैनात सालिना बारा हजार रुो व पालखी आबदागीर शागीर्द-पेशाची नेमणूक करून खर्चास देते होते ते सदरीं साहावे कलमात लिा आहेत. सदरहूचे कागदपत्र सरकारी व आमचे घरचे असे सर्व दाखले दप्तरात हाली कायम आहेत. ते सरकारानी पाहिले म्हणजे खात्री होईल. व पुढे श्रीमंत बाजीराव साो याजकडून आबास खर्चास नख्त जामदारखान्यातून आमचे रुजब्यासारखे हजार नऊसे रुो देऊन सरबर चांगली ठेविली होती. नंतर सन १८१८ इसवी साली कंपणी सरकारचा आमल जाल्यावर मेहेरबान आलपिष्टण साहेब याणी पेशव्याचे मंडळीचा बंदोबस्त केला त्यात आम्हास सालीना साहासे रुो पेनसीन करून दिल्ही. त्यापौ निमे आमचे धाकटे बंधु यास हिसा द्यावयाचा सरकारानी ठराव केला त्याप्राो आजपरियेंत वहिवाट चालली आहे. त्यास सांप्रत याखेरीज दुसरे काही उत्पन्न बिलकूल नाही.

आमचे वय पचावन वर्षे व आमचे बंधूचे वय आठेचाळीस वर्षे बंधूचे नाव रघुनाथ आबाजी काले. ताा ९ आकटबर सन १८४३ इा

7591

ताजा कलम पांडुरंग आबाजी काले याचे चिरंजिवाची नावे बीाा

१ चिंतामण पांडुरंग वय २९	रघुनाथ आबाजी याचे पुत्र ० मृत गणेश रघुनाथ
१ लक्ष्मण पांडुरंग वर्षे २०	१ विनायक रघुनाथ वर्षे २२
१ माहादाजी पांडुरंग वर्षे १८	१ विष्णु रघुनाथ वर्षे २०

¶Pandurang Abaji Kale gives his Kaifiyat describing in what great respect his father Abaji Mahadeo Kale was held for his military experience by Dadasaheb who after his retirement recommended him to Nana Fadnis. Abaji was subsequently sent to invest the Badami fort, where he displayed great valour and captured the fort, receiving a wound in the fight. In later times the personal protection of Sawai Madharao was entrusted to him. He managed the artillery department very efficiently. Bajirao II also valued his services and allowed him his former remuneration. Upon the disruption of the Peshwa's kingdom he was granted a pension by Elphinstone. The applicant prays for an increase of the same.

No. 20] *[30-8-1844*

श्री

यादी राजश्री पुरुषोत्तम भास्कर व लक्ष्मणराव कृष्ण कोल्टकर, वाा कसबे पेण तालुके साकसे सुाा खंमस अर्बैन मयातैन व अलफ. आमचे पणजे कृष्णाजी मोरेश्वर कोलटकर याणी आपली कन्या श्रीमंत कैलसवासी सदाशिव चिमणाजी ऊर्फ भाऊसाहेब पेशवे यास दिल्ही. त्यांचे नाव पार्वतीबाई. नंतर पेशवे सरकारांतून कैलासवासी नानासाहेब यांणी याजला स्वास्थ्य तैनात येकुंणपनाशे रुपये व आसाम्या अकराशे बासष्ट रुपयांच्या व तीन गाव बेचाळीसशे साडेसत्रा रुपये आकाराचे व भात पांच खंडी व इनाम मळा मौजे सापोली येथील पंच्यवीस रुपये उत्पन्नाचा व दस्तक साहाशे बैलांचे याप्रमाणे करून दिल्हे तें आमचे पणजे जिवंत होते तोपर्यंत त्याचें नावे सरकारानीं चालविले. पुढे त्यांचे वडील पुत्र म्हणजे आमचे चुलत आजे गणपतराव कृष्ण यांचे नावे सरकारानीं चालते केले.

नंतर सन आर्बा समानीन आषाढमासीं गणपतराव कृष्ण व लक्ष्मण कृष्ण हे उभयतां विभक्त जाहाले, ते समई गपणतराव कृष्ण यांणी घर जिंनगी आटोपून दौलतीस कर्ज फार होते सबब उत्पन्नांत आपला कांही येक वाटा ठेविला नाहीं. त्याजवरून लक्षुमण कृष्ण यांणी सरकारांत विनंती करून आपले नावे सदरहू स्वास्थ्य नेमून घेतले. त्याची याद सरकारची कैलासवासी नाना फडणीस यांचे कराराची आम्हाजवळ आहे. याखेरीज दुसरे कागद पत्र होते ते आमचा वाडा शके १७६२ सन १८४१ सालीं दग्ध जाहाला त्यात दरोबस्त जळाले. सदरीं लिहिलेले यादीप्रमाणे श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांचे कारकीर्दीत सन खमस मयातैनपावेतो चालले. पुढे सदरहू उत्पन्नापौ कांही कमी करून पेशवे सरकारचे कार्कीर्दीअखेर नेमणूक येकूणतीसशे रुपये व भात खंडी पांच व सापोली येथील मळा पच्चवीस रुपये उत्पन्नाचा व

तीन आसाम्या पांचशे बावीस रुपये उत्पन्नाच्या

याप्रमाणे चालत आले

१ पुरुषोत्तम भास्कर कोलटकर यास
- १ वडील पुत्र मोरेश्वर पुरुषोत्तम उंबर वर्षे २४ चोवीस
- १ मधले पुत्र लक्ष्मण पुरुषोत्तम उंबर वर्षे १९ येकूणीस
- १ कनिष्ट पुत्र गोविंदा उंबर वर्षे ३ तीन साडे तीन

१ लक्ष्मणराव कृष्ण कोलेटकर यास पुत्र येकच त्यांचे नाव गोपाल उंबर वर्षे ३ तीन साडे तीनपावेतो .

सदरहूप्रमाणे वंश आहे. मिति श्रावण वद्य ३ शुक्रवार सन खमस आर्बैन मयातैन व आलफ. तारीख ३० माहे आगष्ट संन १८४४ इसवी.

सही पुरुषोत्तम भास्कर कोलटकर
दस्तुर मोरेश्वर पुरुषोतम कोलटकर

सही लक्ष्मणराव कृष्ण कोलटकर
दस्तुर मोरेश्वर पुरुषोतम कोलटकर

¶*Purushottam Bhaskar Kolhatkar and Lakshman Krishna Kolhatkar mention how the Kolhatkar family was connected with that of the Peshwas and how a saranjam was therefore granted to them. They mention the several divisions in their saranjam and attach a genealogy of their family at the end.*

कृष्णाजी मोरेश्वर कोल्हटकर का. पेण

पार्वतीबाई=सदाशिवरावभाऊ. | गणपतराव | लक्ष्मणराव

लक्ष्मणराव — भास्कर — पुरुषोत्तम — मोरेश्वर

No. 21]

येविसीचा इंग्रेजी दाखला पाठवावा म्हणौन हुकूम. छ २२. — नकल नं. ९४.

जवाब लिहिले आहे

जवाब गेल.

श्री

यादी त्र्यबकराव बच्याजी खांडेकर सुरु सबा अशरीन मयातैन व अलफ आमचे तीर्थरूप कैलासवासी बच्याजी विश्वनाथ खाडेकर यांस नागपुरकर भोसले याचे दौलतीतून श्रीमंत कैलासवासी थोरले रावसाहेब याणी आणून जातीस तैनात नख्त पाच हजार रुपये व मौजे करजविहिरे ता वाडे हा गाव व हती-पालखीचा खर्च चालवून फौजा देऊन कामकाज घेत होते. त्यांस पुत्र दोघे. त्यांत वडील सदाशिवराव, धाकटे आम्ही. वडील सदाशिव बच्याजी सबब शिरस्ते-माफक तैनात व गाव त्याचे नावे वडिलाचे मागे करून शेवा करीत होतो. लढाई-अखेर गाव व तैनात चालली. पुढें कुंपिणीसरकारचा अमल जालियावर मौजे मार हा गाव मात्र आमचा आम्हाकडे सर्वाबराबर चालविला. त्याचा उपभोग बंधु व आम्ही मिळोन सालगुदस्ता पावेतो साठ वर्षे केला. गुदस्ता बंधूची आमची कटकट लागली सबब समजूत होय तोंपावेतो गांव सरकारात अमानत ठेविला. आमची समजूत जाहाली. त्या संधीस बंधूस देवाज्ञा जाली. बंधूस पुत्र आमचा पेशवे याचे कारकीर्दीत दत्त दिल्हा. त्याचे नाव अमृतराव सदाशिव ते व आम्ही मिळोन गांव सोडून घेण्याविसी अर्जी केली. परंतु कमिशनर

चापलीन साहेब बाहादूर याणी गाव आम्हास न देता पेनसील दोघास तीनसे रुपये करून दिल्हे यांत गुजराण होत नाहीं. फार पेचात आहे यात्रिसी अर्जी करितों.

¶*Trimbakrao Bachaji Khandekar recounts his family history, how his father Bachajipant was called to service by Madhavrao I from Nagpur Durbar and how in return for loyal service a village and some other honours were conferred on him, how the same village was allowed to stand in his name by the Company but was taken back by Commissioner Chaplin who sanctioned a pension of Rs. 300 to the writer and his son. The writer applies for more monetary help as he finds it difficult to meet his expenses from the pension.*

बच्याजी विश्वनाथ

सदाशिव — अमृतराव दत्तक

त्रिंबक — (अमृतराव-दत्तक दिला सदाशिवरावास)

No. 22]

श्री

येजंट साहेब जिल्हा दक्षण

यादी सिवराम नरसिव्ह व रामराव नारायेण देशपांडे पो सिरवल सुा आर्बा आर्बेन मयातैन व आलफ सन १२५३ फसली. कारणे यादी दिल्ही ऐसीजे. आमचे तीर्थरूप कैलासवासी नरसो तुकदेव ऊर्फ बज्याबा सिरवलकर हे पेशवे याचे पदरचे मुछदगिरीचे काम व फौज व आराबाचे काम सरकारातून होते. श्रीमंत माधवराव साहेब हे कैलासवासी जाल्यावर आमचे वडील कैलासवासी नाना फडणीस याचे कृपेत वागू लागले. नंतर गादीवर श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब आले. आमचे वडील नानाचे पक्षीचे सबब श्रीमतानी कैद करून किले चावंड येथे सोळा वर्षे ठेविले आणि आमचे घराची व वतनाची व इनाम गावची जप्ती केली. घर लुटले. सन समानात श्रीमंतानी आमचे वडिलास किल्यावरून सोडून कसबे नासिक येथे राहावे, असी आज्ञा जाली. तेथे श्रीमंताची भेट जाली. ते वेळेस वतनाची मोकळीक करून घेतली. इनाम गाव पुणियासी गेल्यावर सोडून देतो याप्रमाणे आज्ञा जाली. स्वारी पुणियासी

येऊन श्रीपंढरीस गेले. तेथून आल्यावर आश्विन मासी लढाई होऊन. कुपणीसरकारचे राज्य जाहले. ते वेळेस खुदावंत आलपिष्टण साहेब बाहादूर यासी मजकूर साकल्य कलविला. त्याणी हुकूम केला की याची तजवीज होईल. हाली कुपणीसरकारातून तुम्हास शंभर रुपये दरमाहा पेनसीन पावेल. त्याप्रो दरमाहाचे दरमाहा पावत होते. वडील मृत्य पावल्यावर मातुश्रीचे नावे वीस रुपये जाहले ते पावत होते. मातुश्री मृत्य पावली नंतर बंद जाले. आमचे वडिलानी पेशवे सरकारात कारभार व फौजेचे काम नाना फडणीस आखरे होई तोपरयेंत केला. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याणी आमचा नाश फार केला त्यामुळे बहुत खराबीत येऊन हाली बायकामुले यासी अन्न खावयास नाही. याप्रमाणे आमचा हावाल जाला आहे. तारीख २७ माहे नवंबर सन १८४३ इसवी.

सही सिवराम नरसिंह देशपांडे
प्रो सिरवळ दस्तूर खुद
सही रामराव[1] नारायेण देशपांडे
पो सिरवल दा खुद

¶Shivaram Narsinha recounts the past history of his family. His father Bajaba Shirvalkar served the Peshwa and Nana Fadnis, but on the accession of Bajirao, he fell into displeasure and was kept a prisoner at fort Chavand for sixteen years. Later on he was released and was given back his watan. Before his inam was restored to him war broke out between the English and the Peshwa. After their success the English granted him a pension of Rs. 100 per month which was discontinued after his death. The writers, sons of Bajaba, pray for some monetary help.

No. 23] [*3-10-1843*

श्री

यादी बहिरो नारायण पिंगळे पेशवे सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ सन १८४३ इसवी.

१ आमचे वडिलास प्रतापगडचा किला वंशपरंपरे दाखल सिवाजी माहाराज याणी दिल्हा. त्यापासून चालत होते. पुढे पेशवाई ऊर्फ मुख्य प्रधान हा अधिकार गेला तत्रापि किला माहाराज सरकारचे तर्फेने मातबर राहावी

१ बज्याबाचा भाऊ नारो तुक्देव याचा मुलगा. Deshpande of Shirval.

म्हणौन चालविला होता. त्याची वहिवाट वर्षे १२० येकशे वीस जाहाली. उत्पन्न रुपये ४०००० च्याळीस हजाराचे होते. खेरीज माहाराज सरकारचे खजिन्यातून पावत होते. तो किला सन समान सितैनात लढाई होऊन रामाजी माहादेव याचे विद्यमाने पेशवे सरकारानी घेतला. नंतर थोरले माधवराव साहेब याणी आमचे चालविण्याबद्दल आमचे वडील माधवराव नारायण व नारो आपाजी व रघुनाथ घोडदेव यास सन तिसा सितैनचे साली सरंजाम वगैरे नेमणूक करून दिल्ही ती बेरीज

५००० सरंजामास गाव देहे सुमारी ६

४००० इतलाख खजिन्यातून रुा

१००० इनाम राजपत्री

२४० यापूर्वी चालत होते ते

१ आम्हास उत्पन्न चालत आहे

७५ आसाम्या चाकरीच्या

१२० श्रीमाहाबळेश्वरचे संस्थानाकडील आसामी

२०० श्रीभवानी किले प्रतापगड येथील संस्थानाकडील आसामी

३२०

पैकी वजा कारकून चाकरीवर असतात त्यास भोजन खर्च व वेतन

९५ १५०

२४५

बाकी रुा

१२६

तारीख ३ माहे

अगटंबर सन १८४३ इसवी. आश्विन शुध १०

शके १७६५

सही बहिरो नारायण पिंगले पेशवे.

¶*Bahiro Narayan Pingale submits a statement about his family regarding the administration of the fort of Pratapgad which was assigned to his ancestor by King Shivaji but which was subsequently taken over by the Peshwa Madhavrao I and a Saranjam granted instead. The writer mentions the Saranjam.*

7597

[1843

श्री

यादी बहिरो नारायण पिंगळे पेशवे याची वंशावळ सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ शके १७६५ सन १८४३ इसवी.

मूळपुरूष मोरो+ त्रिंबक यासी पेशवाई अधिकार जाहाला त्यांस पुत्र

१ पहिले निळोपंत, मोरोपंत वारल्यानंतर याचे नावे पेशवाईचा अधिकार जाहाला

१ दुसरे बहिरोपंत, निळोपंत वारल्यानंतर यासी पेशवाईचा अधिकार जाहाला.

१ येशवंतराव

—

३

बहिरोपंत याचे पुत्र आपाजीराव यास पुत्र नारायणराव यास पुत्र बहिरोपंत उमर वर्षे ५० यास पुत्र

१ पहिले पुत्र दत्तोपंत उमर वर्षे २२

१ दुसरे पुत्र आनंदराव उमर वर्षे ७

येशवंतराव यासी पुत्र गोविंदराव यासी पुत्र

१ पहिले धोंडोपंत.

१ दुसरे रघुनाथराव.

१ तिसरे नारायणराव

—

३

नारायणराव यासी पुत्र

१ पहिले धोंडोपंत

१ दुसरे माधवराव.

धोंडोपंत यासी रघुनाथराव यासी पुत्र नारायणराव उमर वर्षे

¶*This paper gives the genealogy of the Pingale family whose first representative Moropant, was Shivaji Peshwa.*

No. 24] [13-10-1843

श्री

यादी बाो बाजी बलाल व राघो बलाल पटवर्धन सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ कारणे याद लिहून दिल्ही ऐसीजे. आमचे ताा कैलासवासी बालाजी

+ गोत्र हरित, सूत्र आपस्तंभ.

रघुनाथ पटवर्धन हे श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे सरकारजवल कोपरगावास होते. शके १७१८ चे पौषात पुणे मुकामी आल्यावर सरकारातून जातीचे सरंजामास पंधरा हजाराचे गांव शके १७१९ चे सालात दिल्हे होते व त्रिंबक सरसुभ्याचे काम व बागलाणाचे काम व सरकार खास जिलीबीचे काम व कोरीगडची मोहीम किला सर करण्याचे काम सागितले. तो रास्ते याजकडून किला सर जाल्यावर ते कामहि सांगितले. नंतर आमचे तीाा शके १७२६ पौष शुाा ५ मृत्य पावल्यानंतर तीन वर्षे सरजाम चालविला. पुढे आम्ही लहान होतो आणि आमचे कारभारी व चुलते दिनकर रघुनाथ पटवर्धन हे आम्हास वडील याचे व सरकारचे काही बनण्यात फेर आलामुळे गाव शके १७२९ चे आखेरीस जप्त जाले. यानंतर श्रीमंत माहाराज म्हणो लागले की मुले लाहान आणि कैलासवासी बालाजीपंत हे आमचे बंधुवत आहेत. त्याचे चिरंजीव ते आमचेच चिरंजीव आहेत. त्याचे चिरजीव मोठे जाल्यावर त्याचे चालवण्यास आम्हास आशक्य नाही. नंतर पुढे आम्ही नेहमी स्वारीस व सरकारवाड्यात जात होतो. त्यानंतर काही बदोबस्त व्हावा तो कुपणीसरकारचा आमल जाहाल्या * * आम्ही कुपणीसरकारास आर्ज केला. * * * सरकार याणी पाचशे रुपये पेनसीन * * * करून दिल्हे ते आजपावतो पावत आहे. त्यात आमचे कुटुब व मुले २ व आम्ही व आमचे वडील बधू व त्याचा मुलगा व नातू कुटुंबे उभयताची व सापत्न मातोश्री व सिवाय चाकरीचे माणसे आहेत. त्यास इतक्या पेनसीनाच्या बंदोबस्ताने गुजारा होत आसे नाही. त्यास साहेब मेहरबान होऊन वंशपरपरा प्रपच्याचा खर्चाचा बदोबस्त करून देविण्यास सरकार समर्थ आहेत. तारीख १३ माहे आगटवर सन १८४३ इसवी

सई राघो बलाल पटवर्धन दस्तुर खुद

ताजा कलम आमचे वडील बंधूचे बाजी बलाल पटवर्धन याचे उमर ५० वर्षे धाकटे बधू राघो बलाल पटवर्धन उमर वर्षे ४५ सापत्न मातोश्री भागीरथीबाई पटवर्धन उमर वर्षे ५०

कन्या दोन वर्षे उमर ११ व दुसरी ३ पुतणे नारो बाजी पट(व)र्धन उमर वर्ष २३ नातू वडील बंधूचा उमर वर्षे ३.

¶This is a family account of Balaji Raghunath Patwardhan, who served in the Peshwa's suite and who died on 6th January 1805. His son Ragho Ballal submitted this genealogy of his family.

No. 25] [20-6-1724

यादी बाजीराव बिन सुभानजी रणनवरे मौजे राख कर्यात सासवड जिल्हा पुणें कारणे आर्ज करितो ऐसीजे. आमचे वडिलास श्रीमन्माहाराज छेत्रपति स्वामी याणी आमचे आजे मानाजी रणनवरे राजश्री माहादाजी गणेश आजहात देशमुख प्रा वाई याजकडील जमावाचे मधे सिलेदारीची शेवा करीत होते. उदाजी चव्हाण याचे झुजात कडेगावचे मुकामी सिपाई-पणाची शर्त करून स्वामीकार्यावर ठार पडले यासबबे जमीन इनाम देऊन इनामपत्रे आमचे वडिलाचे नावे करून दिल्ही [राज्या. शके ५१ क्रोधीनामासंवछर आषाढ शुध दशमी मदवासरे] [राज्या. शके ४९ च्या पत्रांत "मानाजी रणनवरे दिा रा कानोजी भोसले"]

¶*Bajirao Subhanji Rannavare writes of an inam granted to his grand-father Manaji by King Shahu for his services in a fight against Udaji Chavan at Kadegaon where he lost his life.*

No. 26] [12-8-1829

पौ तारीख २८ सपटबर सन १८२९ इसवी

श्री

यादी मीर साहादत तुलाखान व मीर मुबारक तुलाखान इनामदार मौजे येडगाव ताा आले प्रांत जुनर सुाा सलासीन मयातैन व अलफ. आमचे पंजे मीर आनवरुलाखान हे निजामनमुद्धख याचे दौलतींत राहून त्रिंबकची किलेदारी केली. त्याचे पुत्र मीर सयदुलाखान याणीहि त्रिंबकची किलेदारी केली. नवाब नासरजग व हिदायेत मोहिदीखान व सलाबतजंग याचे दौलतीचे गर्दीत श्रीमंत पेशवे याचा जोर बहुत. कोन्हीकडून मदत नाही. तेव्हा सोडचिठी मुखत्यारीची मीर आनवरुलाखान याणी आणून पेशवे यासी वेलभंडार घेऊन आपली नेमणूक करून घेऊन किला नानासाहेब पेशवे यास सफुर्द केला. त्याची तारीख सन सबा खमसैन मया व आलफ वेळेस रावेर माहालात खानदेशात सरजामास दिल्हे. आलीकडे मीर आनवरुल्लाखान याचे पुत्र मीर सफीयुलाखान याचे वेळेस बाजीरावसाहब याचे आमलात बिगरसंदी खान-देशचे गाव सुभ्यानी जफ्त केले. येडगाव मात्र इनामी राहिले. मीर साफि-युलाखान याचे पुत्र मीर आनवरुलाखान व त्याचे पुत्र आम्ही मीर साहादत-

तुलाखान व मीर मुबारकतुलाखान इनामी गाव आजपरियेंत चालत आहे. आमचे हरवख्त काम येजंटसाहेबाकडे पडत आहे. याजंकरिता आमचे नाव पटात आसावे. त्यास खावदानी मेहरबानगी करून दुसरे नंबरास लिहिण्यास हुकूम जाहाला पाहिजे. तारीख छ ११ माहे सफर.

[सही फारशी]

¶*Mir Sadatulla Khan mentions in this paper the names of his ancestors who held the post of the Killedar of Trimbak.*

No. 27] [*1843*

श्री

यादी मीर साहादत तुलाखा व मीर मुबारकतुलाखा इनामदार मौजे येडगाव तर्फ आळे प्रांत जुनर सन १२५३ फसली कारणे आमचे खानदानीचा पूर्वापार मार कंपनीसरकारास जाहीर होण्याकरिता लिहितो की, दिल्लींत जाहागीर बादशाहाचे व त्याचे पुत्र शाहाजादा याचे वेळेस आमचे आठवे पिढीचे मूळ पुरुष उतम कुळीचे सइयद इराख मुलकातील सावे शहरचे राहाणार नवाब मीर महमद बाकर नाव अजमखा ऊर्फ इरादतखा बाहादर म्हणोन बादशाही किताब याणी मोठमोठी सरकारी कामे करून किताब व बादशाही सरदारी व वजिरी मिळविली. नंतर त्याचे पुत्र आमचे सातवे पिढीचे पूर्वज मीर इसाक इरादतखा याणी शाहाजाहा बादशाहा व आलमगीर बादशाहाचे वेळेस मोठमोठी सरकारी कामे केली. नंतर त्याचे पुत्र आमचे साहावे पिढीचे मूळ पुरुष मीर मुबारकतुलाखा इरादतखा याणी आलमगीर बादशाहा व महमद फरूखशा बादशाहा याचे वेळेस मोठमोठी सरकारी कामे केली. नंतर त्याचे पुत्र आमचे पाचवे पिढीचे मूळ पुरूष मीर हिदायतुलाखा नाव होषदारखा बादशाही किताब याणी मूळची चालत आलेली सरदारी व किताब संभाळून आलमगीर बादशाहाचे पुत्र बाहादुरशा बादशाहाचे वेळेस सरकारी मोठमोठी कामे केली. नंतर महमदशाहा बादशाहा हे तखतावर बसले, त्याचे साहावे साली आमचे पूर्वज मीर हिदायतुलाखा व हलीचे हैदराबादवाले नबाब नामरूदवला याचे चौथे पिढीचे पूर्वज आसबजाहा असे बराबर दक्षणेत आले. नंतर काही दिवस दक्षणची दिवाणगिरी केली; व फार दिवस अवरंगाबाद येथें राहिले. पुढे हिजरी सन ११५७ साली हक जाहाले. याप्रमाणें आमचे च्यार पुरुषानी मिळऊन दीडशे वर्षेपरियंत सरदारी चालविली * * * * त्यानंतर आलीकडे आमचे पणजे मीर आनवरुलाखां याजकडे त्रिंबकचा किला होता, तो श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे याणी घेऊन संन संमान

खमसैन मया व अलफचे साली मौजे येडगाव इनाम देऊन सनद दिल्ही * * * * नंतर आनवरुलाखा वारले. पुढे आमचे आजे मीर सफीउलाखा याणी सन समान सितैन मया व अलफ साली सनदा आपले नावे श्रीमंत माधवराव बलाल पेशवे याजपासून करून घेतल्या * * * * श्रीमंत बाजीराव रघुनाथ पेशवे याचे कारकीर्दीत दिवाणगिरीचे काम बाळोजी कुंजराकडे जाले; त्याणी बहुत लोकाचे नाश केले त्यांत आमचे कुटुंब बेगमीचे गाव विनापराध जप्त केले. * * * *

¶*Mir Sahadatulakhan and Mir Mubaraktulakhan—inamdars of Yedgaon submit their family Kaifiyat, recounting the loyal services rendered by their ancestors to the several Emperors of Delhi and the inam obtained from the Peshwa for surrendering the fort of Trimbak. The writers complain that their inam was confiscated by Baloji Kunjar, the Peshwa's Diwan.*

No. 28] *[1844*

श्रीसांभप्रा

यादी त्रिंबकशेट बिन सदासिवशेट पाटील करंजे मोकदम मौज सिक्रापुर तर्फ पाबळ सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. कारणे याद देतो ऐसीजे. आमचे पणजे मोरशेट करंजे हे सातार मुकामी व्यापार करून होते; व माहाराज छेत्रपति सरकारात देवघेव होती, त्यामुळे माहाराज याणे बालाजी विश्वनाथ यास वस्त्रे दिल्ही, ते समई मोरशेट करंजे यास पेशवेयाचे हावाली केले. तेव्हापासून सातार मुकामी व पुणे मुकामी व स्वारीत जे समई जो ऐवज लागेल तो पेशव्यास द्यावा म्हणोन माहाराज सरकारची आज्ञा जाहाली त्याप्रमाणे ऐवज पेशव्यास देऊन, वराती लाऊन घेत जाव्या असी वहिवाट चालली. तो दमाजी थोरात याणी हिंगणगावास पेशव्यास आटकाविले. ते वेळेस आमचे वडलांनी मदतगिरी करून लाखो रुपयाचे हावाले घेऊन बालाजी विस्वनाथ यास मुक्त केले. त्यामुळे पेशवे सरकारास मोठा उपकार जाहाला असे सरकारचे मनात येऊन श्रीमंत कृपाळु होऊन आमचे वडील आजे धनशेट करंजे याचे नावे जातीस सरंजाम वगैर करून दिल्हा.

यासिवाये सरकार तर्फेणे आनखीहि कामे सांगितली. गुजरात सुटलीनंतर आमदाबादचा सुभा आमचे आजे धनशेट करजे याजकडे सांगितला; व देसी आल्यावर हिकडीलहि गावमामले सांगितले; व पुणे मुकामी मंगळवार पेठ

याची वसाहत करणे म्हणून श्रीमंत याणी सांगितले, त्यावरून आमचे आजे घनशेट करजे याणी केली. सबब श्रीमंताणी तेथील शेटेपना करून दिल्हा, व जकातीचेहि काम सांगितले.

¶*This is a family account of Morshet Karanje, a Maratha banker, whose family still exists practising that profession at Satara.*

No. 29]   [*10-10-1828*

श्री

यादी वंशावळ रंगराव विनायक पुरंधरे इनामदार वास्तव्य को सासवड याची मिा आश्विन शुा २ शके १७५० सर्वधारीनाम सवछरे

मूळ इनाम संपादित पुरुष राघो+ लक्षुमण पुरंधरे यास आवरस पुत्र

१ लक्षुमण रघुनाथ यास पुत्र २ दोघे आवरस

१ बापूजी लक्षुमण वडील यास पुत्र नाही

१ महिपतराव लक्षुमण धाकटे यास पुत्र दत दिल्हा.

२

१ रगराव महिपत यास पुत्र आवरस

१ विनायक१ रंगनाथ यास

१ मातुश्री आनंदीबाई

१ स्त्री सगुणाबाई

१ पुत्र रंगराव दत हाली आहेत.

सदरहूप्रो पुरुष वंशज आसेत. दस्तुर बाळाजी हैबतराव हारकारे निा मार

¶*This is a genealogical account of Ragho Lakshman Purandare.*

No. 30]   [*21-11-1843*

श्री

यादी संताजीराव बिन अनंदराव व सखोजीराव बिन मानाजीराव व जाणराव बिन बजाजीराव सिंदे रविराव मौजे सुकलोणी ता सांडस प्रां पुणे सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे वडील तुकोजीराव सिंदे रविराव हे औरंगजेब

\+ राघो लक्ष्मण मल्हारराव होळकरांचे पदरीं होता. हें घराणें होळकराचे पदरीं होतें.

१ मृत्यु महामारीच्या विकारानें ज्येष्ठ शु. ४ शके १७५० रोजीं सासवड येथें.

पातशाहा याजपासी चाकरीस बहुत दिवस होते. त्याजवल कामकाजे बहुत केला केली. त्याजवरून पातशाहा यांची मर्जी बहुत संतोष होऊन सरदारी वाढऊन नगारा निशाण पालखी व फौजेचा सरंजाम देऊन त्याणी चालविले. पुढे औरंगजेब पातशाहा मयत जालियावर तुकोजी सिंदे रविराव हे मृत्यु पावले. पुढे विज्यापूर येथील पातशाहा यांणी तुकोजीराव सिंदे रविराव यांचे नातू दुसरे तुकोजीराव होते त्यास बोलाऊन नेऊन सरदारीचा बंदोबस्त करून दिल्हा. नंतर काही दिवसानी छत्रपति सिवाजी माहाराज सातारकर यांणी राज्याचा बंदोबस्त केला. ते वेलेस तिसरे तुकोजीराव व मानाजीराव सिंदे रविराव यांस बोलाऊन नेऊन हुजूर चाकरीस ठेवून बंदोबस्त करून देऊन चालविले. पुढे शाहू माहाराज यांणीहि उतम प्रकारे सरदारी चालविली. नंतर पुढे श्रीमंत बालाजी विश्वनाथ सा॥ पंडित प्रधान पेशवे याजबराबर लढाईचे प्रसंगात आमचे वडिलानी जवामर्दी बहुत केली. हे श्रीमंतांनी पाहून बहुत संतोष होऊन मौजे लोणी येथील मोकासा आमल आमचे वडील मानाजीराव सिंदे रविराव यांस देऊन सनद छ ३ माहे सफर सुा॥ आशरीन मया आलफचे साली करून दिल्ही त्याप्रमाणे वहिवाट चालत आली. नंतर पुढे निज्यामआली मोगल याची व श्रीमंत रघुनाथ बाजीराव पेशवे यांची लढाई राक्षसभुवनावर जाली तेथे श्रीमंतांची स्वारी हतीवर बसली होती त्याजला मोगलाचे फौजेने वेढा घातला, त्या समई आमचे वडील संताजीराव बिन मानाजीराव व सुभानराव बिन मानाजीराव सिंदे रविराव व आणखी सात असामी सरदार ऐसे नव असामीनी कस्त मेहेनत जवामर्दी करून श्रीमंतास हातीसहित काढून आणिले. त्यावरून श्रीमंताची मर्जी बहुत संतोष होऊन मौजे सुकलोणी हा गाव द्रोबस्त बा॥ मुा॥ ऐनजी जाहगीर देऊन सनद छ २६ राबिलावल सुा॥ सलास सितैन मयातैन व आलफचे साली करून दिल्ह्या व हती बक्षीस आमचे वडिलास दिल्हा. खेरीज जामदारखान्यातून नख्त जातीच्या तैनाती व स्वाराचा रोजमुरा व पालखी देऊन बंदोबस्त करून दिल्हा. त्याप्रा॥ गावची वहिवाट आमचे वडिलाकडेस निर्वेध चालत आली. आलीकडेस श्रीमंत राजश्री बाजीराव सा॥ पेशवे गादीवर बसलियावर गावची वहिवाट व नख्त रोजमुरा पोत्याकडील याप्रा॥ चालत आले. पुढे कारभारी यांचे व आमचे बनेना असे जाले, तेव्हा त्याणी अदावत करून कुसुराने मौजे मा॥र येथील जती केली तिची मोकलीक व्हावी म्हणोन आम्ही श्रीमंतांस आर्जेहि केला. परंतु आमची दाद घेऊन गावची मोकलीक केली नाही. नंतर पुढे पेशवे सरकारची व कंपणी सरकारची लढाई होऊन बिघाड जाला. ते वेलेस कंपणी सरकारचे लोक कोरेगांव व लोणी येथे वगैरे आणखी गावी होते ते श्रीमंतांची फौज आली म्हणोन

आदमासे शंभर लोक पलटणीचे व नौकर लोकहि सारे आमचे गावी जमा होऊन आम्हास बोलिले जे, हे वेलेस आमचा बच्याव करावा, नाही तरी आम्ही दरोबस्त मारले जातो ऐसे बोलिले. त्यावरून आम्ही त्यास गावात आश्रय देऊन बंदोबस्त ठेवला तो इतकियात श्रीमंतांची फौज आली. त्यासी कंपणीसरकारचे लोकांचा बच्याव होण्याबद्दल बदलून गोष्ट सांगितली. सरकारचे लोकांचा बच्याव बहुत तरेने केला. श्रीमंतांची फौज निघोन गेलियावर मेहेरबान जनराल इसमिट सो बाहादूर यांची स्वारी गावी येऊन सदरहू मजकूर समजले. सरकारचे लोकानी त्यास जाहीर केले त्यावरून त्याची मर्जी बहुत संतोष होऊन सन १८३० इा ताा ११ नवंबर रोजी आम्हास त्याणी आपले सरटिपिकिट विलाइतेस जातेसमई लिहून दिल्हे आहे. दरम्यान श्रीमंताचे राज्याचा बंदोबस्त कंपणीसरकारानीं केला ते वेलेस आमचाहि बंदोबस्त होऊन गावची मोकलीक व्हावी, परंतु आम्ही गैरमाहीत व कंपणीसरकारचा अंमल जालियावर आम्ही गावी नवतो. श्रीचे यात्रेस गेलो होतो. तेथोन आलियावर सो मबसूफ यांची पुणे मुकामी येऊन भेट घेतली आणि सदरहू मजकुराचा आर्ज केला, परंतु बंदोबस्त जाला नाही. याजकरिता हली सरकारास अर्ज आहे. तरी कंपणी सरकारचे नेकनामीची कीर्ति सर्व राज्यात प्रसिद्ध आहे त्यापेक्षा आम्हावरहि मेहेरबानगी करतील. कारण आम्हास उपजीविकेस दुसरे उत्पन्न काही नाही. गुजारा तर चालला पाहिजे याजकरिता कृपा करून मौजे लोणी येथील जाहागिरीचा अमल आमचा आम्हाकडे चालत आला आहे, त्याप्रो गावची मोकलीक होऊन आम्हाकडेस चाले असी तजवीज कर्णे सरकाराकडेस आहे. गावच्या सनदा व वंषावलीचे झाड व जनराल इस्मिसो बाहादूर यांणी कंपणीसरकारचे नामांकित सरदार जे असतील त्याणी आम्हावर मेहेरबानी करीत असावी म्हणोन सरटिपिकिट आम्हास दिल्हे आहे त्याचीहि नकल यादीबरोबर सरकारास पाहण्याकरिता दिल्ही आहे. पाहण्यात येऊन आमचे चालविण्याविसी मेहेरबानी करून बंदोबस्त होय ते केले पाहिजे. ताा २१ माहे नवंबर सन १८४३ इा.

सही: संताजी बिन आनंदराव सिंदे रविराव दाा खुद.
सही: सकाजी बिन मानाजी रविराव सिंदे दाा संताजीराव.
सही: जानराव बिन बजाजीराव सिंदे रविराव दाा खुा

¶*The Ravirao Sindias of Sukloni submit their family Kaifiyat recounting the past glories achieved by some of the illustrious persons in their family from the times of Aurangzeb down to those of the Company.*

7605

No. 31] [*27-10-1843*

नंबर १५७२

श्रीगणराज

यादी नीलकंठराव रामचंद्र पागे सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे आजे कैलासवासी नीलकंठराव रामचंद्र व तीर्थरूप रामचंद्रराव नीलकंठ याणी पेशवे पंत प्रधान याची सेवाचाकरी येकनिष्टपणे करून जवा मर्दुमीने लढाया घेऊन सरंजाम व इनाम वगैरे मिलविले.

बुंदेलखंड वड़गई प्रांत हिंदुस्थान येथे बखेडा जाला. सबब तेथील बंदोबस्ताकरिता वीस हजार फौजेचा हुकूम श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याणी सांगून कैलासवासी नीलकंठराव रामचंद्र याची रवानगी केली. * * * * कैलासवासी नीलकंठराव रामचंद्र मुलकी जाऊन फौज मिलऊन येक लढाई घेऊन काही बंदोबस्त केला, व काही राहिला तो येक दोन लढाया घेऊन करावयाची उमेद होती; परंतु येकायेकी आजारी होऊन नीलकंठराव रामचंद्र मयेत जाले. वडिलाने सरंजाम वगैरे संपादन केला त्यास अजमासे शंभर वर्षे होत आली.

¶*Nilkanthrao Ramchandra mentions his loyal and brave services to the Peshwa in the wars in the North.*

No. 32] [*1843*

श्री

यादी रामराव बिन येशेवंतराव भोसले साकरीकर प्रा खानदेस सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे वडील कैलासवासी कालोजी बीन सोमाजीराम भोसले हे छेत्रपति शाहु माहाराज सातारकर याजवल चाकरीस राहिले. नंतर हामेशा लढाईचे प्रसंग पडत गेले. त्यात आमचे वडील यानी जवामर्दीचे कामे बहुत वेलां केली. त्यात मोगलाकडील पठाण पंचवीस हजार फौज घेऊन माहाराजासी लढाईचा प्रसंग करावा म्हणोन येऊन, सातारियापासून पाच कोशावर येऊन मुकाम केला, ते वेलेस माहाराजाचा फौजेचा जमाव कमी होता. पठान याची फौज पंचवीस हाजार यामुलें माहाराज फार दिलगीर जाले; आणि आमचे वडील कालोजीराव यास बोलाऊन पुसले की शेत्रु भारी आहे, याचा विचार कैसा करावा? त्यावर कालोजीराव यानी फार तरेन माहाराज याची खात्री करून पैजचे विडे घेतले की आजचे लढाई करून शेत्रूचा पराभव करितो. नंतर सरकारची आज्ञा घेऊन, सरंजाम सिध करून पठाण याची लढाई करून त्याचा मोड करून पठाण यास जिवे मारिले, हे माहाराजानी पाहून बहुत संतोषे

होऊन सरंजाम येक लक्ष रुपायाचा दिल्हा. * * * * त्या दिवसापासून कालोजी भोसले याचे मागे आम्ही सरवत्र भाऊ याजकडे वहिवाट श्रीमंत रा। बाजीराव साहेब पेशवे याचे आमलातहि चालत आले. दरम्यान शके १७३६ साचे साली त्रिंबकजी डेंगले यानी सरकार परवानगी नस्ता सदरहू माहालची जप्ती केली. * * * * यावर कंपनीसरकारानी राज्याचा बंदोबस्त केला, ते वेलेस आमचे चुलत बंधु रा। नारायेणराव बिन गिरजोजीराव व त्रिंबकराव बिन पिरोजीराव व येशवंतराव बिन मालोजीराव व आम्ही ऐसे च्यार आसामी व पिराजीराव बिन मानाजीराव व कलसिंगराव बिन महिपतराव ऐसे पुने मुकामी येऊन साहेब बहादुर याची भेट घेऊन सरंजामाची मोकली करून द्यावी म्हणोन यादी देऊन, कागदपत्र संदा दाखविल्या, परंतु सरंजामाची मोकलीक अद्याप करू न दिल्ही; आण सरकारातून पेनसिनी ताहायात सालिना करून दिल्ह्या. * * * *

¶*Ramrao Yeshvantrao Bhonsle of Sakri recounts how his father Kaloji led a very successful attack against an army of the Nizam near Satara and how the King being pleased by this act of bravery conferred a Saranjam on him worth about a lac. Later on the Saranjam was confiscated by Trimbakji Dengle. The writer prays for the restoration of the confiscated Saranjam.*

No. 33] [*24-12-1843*

श्री.

यादी राजश्री रामराव व्यंकटेश गुणे

सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ सन १२५३ फसली. आमचे पणजे बालाजी जनार्दन यास श्रीमंत माहाराज छत्रपति यानी श्रीमंत पंत मंत्री यांची मुतालकीची असामी करून दिल्ही. त्यास पुत्र रामाजी बलाल व लक्ष्मण बलाल व धोंडो बलाल व बापूजी बलाल व कृष्णराव बलाल असे होते. त्यास असाम्या व सरंजाम पेशवे सरकारातून होता व इनाम पंत प्रतिनिधि याजकडून होता. व रामाजी बलाल यांस भोसले याजकडील वकिलीचे काम होते व त्यांचे नावे सरकारातून सरमजाम गाव दोन व प्रतिनिधि याजकडून इनाम गाव दरोबस्त येक व वकिलीसमंधे वेतन खेरीज होते. व लक्ष्मण बलाल श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब यांचेजवळ होते, ते पानिपतावर श्रीमंत भाऊसाहेब यांजवर गर्दी जाहाली त्या वेलेस त्यांजबरोबर गेले. व कृष्णराव बलाल यास पायगुडे यांचे पागेची असामी दिवाणगिरीची होती. तिची तैनात नक्त

रुा॰ १६९९।॰ व धोंडो बलाल यांचे नावे, आमचे पणजे बालाजी जनार्दन मृत्य पावल्यानंतर, श्रीमंत पंत मंत्री याजकडील मुतालकीची असामी होती ती मारनिल्हे यांचे नावे जाहली; ती पुढे त्यांचे पुत्र जगनाथ धोंडदेव याचे नावे चालली. * * * * * * * *
* * * * * * * * * *
पुढे रामाजी बलाल मृत्य पावल्यानंतर त्यांचे पुत्र सदासिव राम यांचे नावे चालत आले. पुढे सदासिव राम मृत्य पावल्यानंतर आमचे आजे बापूजी बलाल यास पुत्र व्यंकटराव बापूजी याचे नावे सरंजाम वगैरे सरकारातून करार करून दिल्हा. त्याजवर व्यंकटराव बापूजी राजश्री हरिपंततात्या फडके याजबरोबर कर्नाटकचे स्वारीस गेले तेथे मृत्य पावले. त्याजवर मामूलप्रो आमचे नावे सदरहू सरंजाम वगैरे येकंदर चालत आला त्याचा ताा:
* * * * * * * * * *
* * * * * * * * * *
येणेप्रोा आम्हाकडे चालत होते; त्याप्रो चालू आहे व गैरचालू याचा ताा सदरी लिहिला आहे. व आम्हा उभयेतास पेसन रुा ६०० सालीना चालू कुंपणी-सरकारचा अमल जाल्यापासून आहेत. * * * * *
* * * * * * * * * *

तारीख २४ दिशंबर १८४३ इसवी.

सही: रामचंद्र व्यंकटेश गुणे कालेकर दस्तुर खुद.

¶*Ramchandra Vyanktesh Gune submits his family Kaifiyat recounting the services of his great-grand-father Ramaji Ballal and his brother Lakshman Ballal. The writer gives a list of the Saranjams granted to his family by the King and mentions the pension granted to him by the Company in return for a portion of the Saranjam taken back.*

No. 34] [*1843*

श्री

यादी लक्ष्मणराव बिन संताजीराव धायबर पाटील मोकदम मौजे सिक्रापूर तर्फ घावल सुाा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे निाा पंजे संताजीराव धायबर याणी श्रीमंत माहाराज सिवाजी राजे छत्रपति याजपासी लढाईत बहुत कामेकाजे केली, त्याजवरून माहाराज कृपालु होऊन पतक शेंभर स्वाराचे देऊन सरदारी दिल्ही, व त्याचे व जातीचे खर्चाबद्दल खानदेश प्रांती व देशी मिलोन आकार रुपये ३२००० चे गाव व माहाल दिल्हे (* * * *)

पुढे ते काही दिवसानी निवर्तले. त्याचे पोटी पुत्र वडील तानाजीराव व धाकटे सुलतानराव या उभयताचे नावे पेशजीप्रमाणे सरंजाम बाहाल होऊन सरकारातून चालविले. पुढे ते निवर्तले. सुलतानराव याचे पोटी पुत्र वडील संताजीराव व धाकटे प्रतापराव व तानाजीराव यांस पुत्र सटवाजीराव; त्यापैा संताजीराव व सटवाजीराव या उभयेताचे नावे सरंजाम पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें चालविले. पुढे ते शके १७३४ साली उभयता मृत्य पावले. नंतर शके १७३९ साली श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब याणी जप्ती केली ते वेळेस आम्ही हिंदुस्थानात दवलतराव सिंदे सरकार याजपासी चाकरीस होतो, तेथे सरंजाम जप्त जाहला. * * * * पुढे कुंपणीसरकारचा आमल शके १७३९ साली जाहला. नंतर आमचे चुलते प्रतापराव व आमचे दुसरे चुलते सटवाजीराव याचे पुत्र भवानराव उभयतां कुंपणी सरकारास भेटले. तेव्हा सरकारातून प्रतापराव याचे नावे सरजामाबदल रुपये सालीना १००० हाजार जातीस करून दिल्हे व भवानराव याचे नावे पाच हजार रुपयाचा सरंजाम मौजे उछेदगाव प्रां जेंबुसर हा दिल्हा; तो गाव सन १८३३ साल पावेतो चालला. * * * *
आमची वौशावल आहे ती बिा :—

१ भवानराव याचे पोटी पुत्र बलवंतराव बिन भवानराव याचे वय १९.
० लंग

१ प्रतापराव याचे नातू गोविंदराव याचे वय २०
१ आमचे बंधु कासीराव याचे पुत्र गोपालराव याचे वय २७
१ आमचे पुत्र माधवराव याचे वय २९

¶*Lakshmanrao Santajirao Dhaybhar submits his family history describing how the Saranjam was granted by Shivaji to the writer's ancestor for his loyal services, how later on it was confiscated by Bajirao and how under the Company's regime his cousins received a pension and a Saranjam. The writer gives his genealogy.*

No. 35] [*11-11-1844*

श्री

यादी विठल चिंतामण पुणेकर वकील व माहादाजी चिंतामण पुणेकर निा गोखले सुा खमस आर्बैन मयातैन व अलफ. श्रीमंत कैलासवाशी धोंडो बळाल व बापूसाहेब गोखले याणी शके १७१९ चे सालापासून आमचे तीर्थरूप कैलासवाशी चिंतो त्रिंबक व चुलते माहादाजी त्रिंबक यास साडेसातशे स्वाराचे पथकाची

नेमणूक करून देऊन आपणाजवळ चाकरीस ठेविले. पुढे धोंडजी वाघ याचे लढाईत माहादाजी त्रिंबक यास जखम लागोन ठार जाहाले. पुढे चिंतो त्रिंबक याचे नावे पतकाची नेमणूक चालत आली. आलीकडे आम्ही वयाने थोर जाहाल्यावर नवीन दुसरे पाचशे स्वाराची नेमणूक बापूसाहेब याणी करून देऊन चालविले. त्याचा तपसील सरसालास स्वाराचा रोजमुरा खेरीज करून नेमणुका तीर्थरूपसुद्धा बितपसील रुो

८५०० चिंतो त्रिंबक यास नख्त * * * * * *
* * * * * * * * * * *
४००० विठल चिंतामण पुणेकर यास नख्त रुो
३००० महादजी चिंतामण पुणेकर यास.
४०० कारकून नि॥ होते आ २ दर सालीना रुो २०० प्रो पावत होते.

१५९००

येकूण सदरहू नेमणुका करून दिल्ह्याप्रो पावत आले. नंतर शके १७३९ साली श्रीमंतांची व कंपणीसरकारची लढाई मौजे आष्टी नजीक श्रीपंढरपूर येथे जाहाली. त्या लढाईत विठल चिंतामण यास गोलीची व तरवारेची अशा दोन जखमा लागल्या. याजमुळे पतकाची अफरातफरी जाहाली. नंतर कंपनी सरकारचा आंमल जाहालियावर गोखलेसाहेब यांचा सरंजाम जप्त जाहाला. पुढे सरकारानी पेशवे याजकडील सरदार लोक यांचे बंदोबस्त केले त्येवेलेस बापूसाहेब यांचे कुटुंब श्रीमंत यमुनाबाईसाहेब यास गुजाऱ्याकरिता काही जाहागीर व इनाम गाव सोडले. नंतर बाईसाहेब याणी आम्हास बलाऊन आणून सांगितले की, पेशजी तुम्हास येजमानसाहेब याजकडून बहुत पावत होते. हाली इंग्रजबाहादूर याणी आम्हास नेमणूक करून दिल्ही त्यात आमचा गुजारा होणे कठिण. परंतु, तुम्ही आमचे बहुत उपयोगी पडत आला, तेव्हा तुमचे चालवणे अवश्य. यास्तव तुम्ही आमचे जवळ राहावे. तुम्हास सालीना नेमणूक पावेल बितपसील रुो.

१२६७ विठल चिंतामण पुणेकर यास कंपणी सरकारात वकिलीचें काम व सौंस्थान राममंदिरची वहिवाट इनाम गाव देवाचे खर्चास देऊन सांगितली त्यास सर सालीना नेमणूक रुो

६०० माहादाजी चिंतामण यास कर्नाटकातील सरंजामी गावचे देखरेखीस ठेऊन त्यास सरसालीना नेमणूक रुो.

२०० कारकून निा होते ते आा २ दरसालीना रुो १९० प्रो रुो

२१६७

येकूण येकवीसे सदसष्ट रुपयाच्या नेमणुका करून दिल्ह्या त्याप्रो पावत आल्या. पुढे शके १७६३ वैशाख वद्य शष्टीस श्रीमंत यमुनाबाईसाहेब मृत्य पावली, सबब त्याजकडील सरंजाम व इनाम गावची जप्ती सरकारातून जाहाली. यामुळे आमच्या नेमणुका बंद जाहाल्या. याजकरिता सरकारास अर्ज आहे की, आम्ही गोखलेसाहेब यांचे पदरी नोकरी नेकीने केली व त्याजकडूनहि सदरहू लिहिल्याप्रो नेमणुका पावत आल्या आहेत. त्यास आमचे कुटुंबाची माणसे तपसील :

* * * * * * * * *

* * * * * * * * *

येकूणपंचवीस मनुष्ये कुटुंबाची आहेत त्यास उपजीविकेस आधार नाही. फार हलाखीत आहोत. याजकरिता सरकारानी गुजाऱ्याचा बंदोबत कृपा करून करून दिल्हा पाहिजे. श्रीमंत यमुनाबाईसाहेब गोखले यांचे नाव यजिंटीचे पहिले प्रतीत होते. दुसरे आणखी सरदार लोक पुरंधरे व निपाणीकर व आंगरे व कितुरकर व दुसरे प्रतीतील मेहेंदले व ढंढरे व माणकेश्वर वगैरे सरदार लोक मयत जाहालेत त्यांचे पदरचे माणसांची गुजाऱ्याची तजवीज सरकारानी केली आहे. त्यास आम्हावरहि सरकारानी मेहरबानी करून आमचे गुजाऱ्याची तजवीज सदरहू नेमणुकावर लिहिल्याप्रो चालऊन केली पाहिजे. मिा कार्तिक शुा १ शके १७६६ क्रोधीनाम संवत्सरे सन १८४४ इा.

सही : विठल चिंतामण पुणेकर वकील
निा गोखले दस्तुर खुद.
सही : माहादाजी चिंतामण पुणेकर
निा गोखले दस्तुर विठल चिंतामण.

¶*Vithal Chintaman and Mahadeo Chintaman who were in the service of Bapu Gokhale appeal to the Deccan Commissioner for monetary help and in support of their claim they give their family history saying that their father served Bapu Gokhale with his squadron, that he suffered wounds in the fight against Dhondji Wagh, that after Bapu Gokhale the remuneration was continued by his wife Yamunabai but was stopped after her death in May 1818. Raoji Vithal and Shankar Vithal Punekar were recently in Baroda service.*

7611

No. 36] [1843

श्री

यादी विश्वास खंडेराव रास्ते सुा आर्बा आर्बेन मयातैन व आलफ सन १२५२ फसली. आमचे खानदानीची कैफियत वगैरे लिहितो जे, विज्यापूर पातशाहा कारकीर्दीत आमचे वडील मौजे वेलणेश्वर तर्फ गुहागर तालुके आंजनवेल येथे वतन खोती व माहाजन व इनामदार असोन सावकारी व्यवहारहि करीत होते व कोकणचे रसदेचा कारभारहि करीत होते. उपनाम मूळचे गोखले परंतु रास्त चालीच्या व्यवहारारून रास्ते आसे नांव चालू जाले. पुढे श्रीमन्माहाराज शाहू राजे छत्रपति यांजवळ सातार मुकामी आमचे पूर्वज्याचे पाचवे पुरुष हरबाजी नाईक व त्यांचे कनिष्ट बंधु भिकाजी शामराज हे हली बलवंतराव माधव रास्ते यांचे चवथे पुरुष त्या उभयतानी माहाराजांची कृपा संपादन केली आणि माहाराजाजवळ तिसरे बंधु सदासिव शामराज कामावर ठेऊन कसबे वाई येथे माहाराजानी जागा दिली तेथे घरे बांधून हरबाजी नाईक व भिकाजी नाईक राहिले. व्यवहार सावकारीचा करीत होते. पुढे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस भिकाजी नाईक यांची कन्या गोपिकाबाई माहाराजानी देविली. नंतर श्रीमंतानी धोंडो हरबाजी अमचे चवथे पुरुष व त्याचे बंधु विठल हरबाजी व कृष्णाजी हरबाजी या त्रिवर्ग बंधूस मौजे असवली व मौजे पळसंडी नजीक वाई व मौजे नांदगांव तालुके राहुरी हे तीन गांव दिल्हे. आमचे वडिलांचा गांव नांदगांव इनामी हाली आम्हाकडे चालत आहे व श्रीहरिहरेश्वराचे देवालय वाई येथे आमचे पणजे धोंडोबा नाईक याणी बांधिले, त्यास श्रीचे खर्चास श्रीमंतानी आठशे रुपये आजमासाची जमीन व पेठेचे उत्पन्न अजमासे रुपये दोनशे येकूण अजमास येक हाजार रुपयाचे इनाम दिल्हे व श्रीमंत पंत प्रतिनिधि याणी दोनशे रुपये अजमासाची जमीन श्रीकडे इनाम दिल्ही. येकूण बाराशे रुपयाचे इनाम कसबे वाई येथे श्रीकडे खर्च पडोन आमचे आम्हाकडे चालत आहे. पुढे आमचे आजे नीलकंठराव धोंडदेव यास बापू रास्ते असे म्हणत असत ते कर्नाटकात गेले होते. तेथे त्यास नबाब हैदरनाईक याणी पेशवे सरकारचे मनुष्य म्हणौन कितियेक दिवस प्रतिबंधांत ठेविले व पुढे श्रीमंत माधवराव बलाल पेशवे याणी हैदरनाईक याजकडून जबरीने आणौन आपलेजवळ ठेविले. खर्चवेचास सरकारातून देत होते. त्यास पुत्र दोन, वडील विनायकराव, कनिष्ट आमचे तीर्थरूप खंडेराव तात्यासाहेब. पैकी विनायरराव घरीं वाईस होते व काही दिवस परशरामभाऊ पटवर्धन यांजबरोबरहि होते. आमचे तीर्थरूप खंडेराव तात्यासाहेब यांस श्रीमंत माधवराव नारायण पेशवे यांचे कारकीर्दीत नाना फडणवीस याणी सरदारीची वस्त्रे देऊन पटणचे स्वारीत हरिपंत

तात्या फडके यांजबराबर दिल्हे : स्वारास व जातीस तैनात हुजुरून पावत होती व पटणचे स्वारीहून परत आल्यावर दरबारचे कामकाज नाना फडणवीस घेत होते. याप्रमाणे श्रीमंत माधवराव नारायण पेशवे यांचे कारकीर्दी आखेरपर्यंत चालले. नाना फडणीस याणी श्रीमंताची खात्री केल्यावरून पुढे श्रीमंत बाजीरावसाहेब राज्यावर आल्यानंतर त्याणीहि वसई सरसुभा व मुतालकीची सिकेकटार सन इसने मयातैन व अलफ सन इा १८०१ या सालात दिल्ही व हापसी जंजिरेकर याणी कोकण प्रांतात बखेडा केला त्याचे बंदोबस्ताकरिता हुजुरून फौज देऊन रवाना केले. याप्रमाणें तेथील बंदोबस्ताचे कामावर असता पुणे मुकामी सलास मयातैनात म्हणजे सन १८०२ इसवी येशवंतराव होळकर येऊन लढाई जाली तेव्हा श्रीमत बाजीरावसाहेब यांची स्वारी कोकणात गेली. नंतर माहाडाचे मुकामी खंडेराव तात्यासाहेब यास बोलाविले. त्याजवर तात्यासाहेब यांचे मदतीने स्वारी वसईस गेली. तेथे पेशवे सरकारचा व कंपनीसरकारचा तह होऊन श्रीमंत बाजीराव साहेब पुण्यास आले तेव्हा तात्यासाहेब यासहि बरोबर आणिले. अशा संकट प्रसंगात हारवक्त सरकार चाकरी बरहाक केल्यामुळे वसई सरसुभा चालत होता, तो कायम ठेऊन आणखी शहर पुणे येथील कामकाज व विजयदुर्ग व लोहोगड, विसापूर हे किले मुलूकसुद्रा व जंबूसर सरसुभा वहिवाटीस हावाली केले व साठ हजार रुपयाचा सरंजामाचा मुलूक मुकरार करून देऊन सनदा करून दिल्ह्या. नंतर बाबूराव फडके याणी बंड केले होते त्याचाहि बंदोबस्त तात्यासाहेब याणी केला. त्याजवर शके १७२८ चे साली सन १८०६ इसवी अंगरे सरखेल कुलाबेकर याजवर घरकल्हामुळें तंटा होऊन बाबूराव अंगरे वजारतमाब सवाई सरखेल याजला भाऊबंद याणी पदच्युत कर्ण्याचे अरंभून युध्ध प्रसंग आला ते वेळेस अंगरे याणी तात्यासाहेब यांजकडे वकील पाठऊन या प्रसंगास आमचे संरक्षण करावें असे बोलणे केल्यावरून श्रीमंत बाजीराव साहेब यांची आज्ञा घेऊन फौजसुधा कुलाब्यास जाऊन आपले पदरचे लाखो रुपये खर्च करून बाबूराव अंगरे यांचे शत्रूचे पारपत्य करून त्यांस संस्थानी कायम केले. याज़मुले त्याणी पाच हजार रुपयाचे इनाम जातीस व सिवाय पदरचे मंडळीचे नावे इनाम दिल्हे व माणिकगड किला चवदा हाजाराचे गांव सुध्धा व श्री सांबाचे उछाहाकडे मौजे नावाडे व खैराणे हे दोन गाव अजमासे पांचशे रुपयाचे दिल्हे. येणेप्रमाणे आमचे तीर्थरूप याणी श्रीमंत बाजीराव साहेब यांचे संकटसमई मोठे साहसाची कामे केली व अनेक प्रकारे उत्पन्न जालेली लाहान मोठी बंडे मोडून श्रीमंतास स्वस्थपणा जाहाला. त्या अवसरात श्रीमंताजवलचे खुशामती अर्जवी बोलणारे

लोकानी आमचे तीर्थरूपाचे वैभवाचे हेव्याने कंपनीसरकारासी दोस्ती ठेऊन आमचे तीर्थरूप वागतात असे श्रीमंताचे मनात वागऊन वाकडेपणा आणिला. तेणेकरून त्या समयास आमचे नुकसान इतके जाले की दरोबस्त मामले व सरदारी सरंजाम वगैरे श्रीमंतानी परत घेतले. त्या वेळेस श्रीमंताचे व आमचे तीर्थरूपाचे दरम्यान कंपनीसरकार पडून परस्पर खटले तुटक केले. येविसी दाखले कंपनी सरकारात असतीलच व आमचे तीर्थरूपाची आबरू कसी होती याबाबे कर्णेल कलुष साहेब रिसदेंट याचे सरटिफिकिटातहि मार आहे. त्याची नकल या यादीबराबर दिल्ही आहे. आमचे तीर्थरूपानी पेशवे सरकारची चाकरी कसी इमानेइतबारें केली येविसी ग्राउंड डफ साहेब याचे बखरेत भाग ३०।३२ या दोन भागात थोडासा मजकूर लिहिला व कंपनीसरकारचा आवल आमल होताच तारीख ११ फेब्रुवारी सन १८१८ इसवीत मेहरबा(न) आलपिष्ट-साहेब याणी जाहीरनामा लाविला त्यातहि लिहिले आहे. त्या जाहीरनाम्याची नकल यादीबराबर पाठविली आहे. नंतर तात्यासाहेब यांस सन अशर मयातैन व अलफ सन १८०९ इसवी या साली देवआज्ञा जाली. त्याजवर आंगरे सरखेल याणी आमचे वडील बंधु गोपालरावजी यासी तंटा केला सबब उभयताची लढाई किला माणेकगड येथे जाली. नंतर मुबैचे गवर्नरसाहेब बाहादूर यांस मार समजविल्यावरून त्याणी गोपालरावजी यांस पत्र लिहिले की खटला करू नये. उभयताचा ठराव पुण्याचे रसिदेंट साहेब करतील. त्याजवरून मेहेरबान अलपिष्टन साहेब बाहादूर रसिदेंट याणी अंगरे याचा व आमचा मजकूर समजून घेऊन किला माणिकगड अंगरे यास सरजामसुद्धा परत देविला आणि पाच हाजार रुा नक्त मुबैसरकारचे मार्फतीने गोपाळरावजी यांस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने द्यावयाचा ठराव करून त्याप्रमाणे त्यास पावत गेले व पेशजीचे पाच हजार रुा याचे गांव खुद आम्हास दिल्हे व पदरचे मंडळीस गाव देऊन सदरहू इनाम चालविणेविसी कंपनी सरकारची दरम्यानगत आहे. पुढे पेशवे सरकारचे राज्य कंपनीसरकारात आले. पेशवे सरकार व कंपनीसरकारचा बिघाड होऊन लढाई ज़ाहाली, ते समई आमचेकडून कंपनी सरकारास द्रव्यद्वारे वगैरे मदत जाली त्याचे दाखले आमचे व राजश्री बालाजी नारायण नातू युध्धप्रसंगी आमचे तर्फेने पुढे हरयेक कामात वागत होते. कंपनी सरकारातून मुकाम चिंचवली इलाखा सातारा येथे आम्हांस पोषाख सिरपेच वगैरे देऊन व आमचे तीर्थरूपास पेशवे सरकारातून जो सरजाम चालत होता त्यापौ अजमासे बतीस हाजारांचा सरजामाची मोकलीक केली. त्या सरजामाची वहिवाट आम्हाकडे कंपेश येक साल चालली. आमचे तीर्थरूपानी कंपनी सरकारात राजश्री बालाजी नारायण

नातू वकिलीचे कामावर हामेशा ठेविले होते. त्याप्रो आंम्ही लाहान अस्ता त्यास तैनात वगैरे देऊन वकिलीचे कामावर वगैरे ठेविले होते. कंपनीसरकारचा अमल जाल्यावर येक वर्षानंतर त्यास सरकारातून इनाम व पेनसीन मिलोन चोवीस हजार रुपयाचे दिल्हे आहे. आम्हांस सरजाम दिल्हा होता तो परत घेऊन तारीख १ माहे ज्यानेवारी सन १८२० पासून साहा हाजार रुपये सालीना पेनसीन करून दिल्हें ते आजपर्यंत चालत आहे.

¶*This is an account of the family of Khanderao Nilkanth Raste submitted by his son Vishwasrao.*

No. 37] [*5-10-1843*

श्री

यादी राजश्री विश्वासराव भास्कर गोखले सुा आर्बा आर्बैन मयातैन व आलफ. आमचे चुलते कैलासवासी विसाजी राम गोखले व आमचे वडील भास्कर राम हे पूर्वी धोंडो बलाल गोखले, म्हणजे बापूसाो गोखले यांचे चुलते, हे फौजसुध्धा करणाटकात श्रीमंत सवाई माधवराव साो पेशवे याचे कारकीर्दीत श्रीमंत नाना फडणीस याणी बंदोबस्ताकरिता ठेविले त्याजपासी स्वार पायदल सुध्धा चाकरीस होते. . धोंडोपंत यांची व धोंडजी वाघ निा टिपू सुलतान याची लडाई होऊन धोंडोपंत सरकार कामास आले. माग बापूसाो गोखले यांचे नावे सरदारीची वस्त्रे पेशवे सरकारांतून जाली. नंतर इंग्रज बाहदूर याची दोस्ती करून मदतीस दोन पलटणे आणून फौजसुध्धां बापूसाो याणी लढाई देऊन धोंडजी वाघ याचे पारपत्य केले. नंतर येशवंतराव होलकर पुणे मुकामी येऊन श्रीमंताबरोबर लढाई घेतली. ते समई श्रीमंत वसईस निघोन गेले आणि कंपणीसरकारासी दोस्ती करून होलकर याचे पारपत्य व्हावे या इराद्याने कंपणीसरकारासी बोलण्यात आणून मेहेरबान वलसली साहेब बाहदूर याची नमणूक कंपणी सरकारांतून जाल्यावर होलकर पुणे सोडून उतर देशात गेले. नंतर श्रीमंत वसईहून पुणे मुकामी आले व वलसलीसाो पलटणेसुध्धा पुणे मुकामी दाखल जाले. त्याजबरोबर बापूसाो गोखले सरकार आज्ञेवरून फौजसुध्धा आले. पुढे होलकराचे मागे वलसलीसाो गेले त्याजबरोबर बापूसाो यांची नेमणूक पेशवे सरकारातून जाली. ते समई बापूसाो यांचे फौजेचा कारभार व चाकरीचुकरी आमचे चुलते व वडील करीत होते. ती स्वारी फते होऊन गाईलगडापासून माघारे पुणे मुकामी आल्यावर गोखले यांसी, श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांचे व पेशवे सरकारचे वयमनस आल्यामुळें, त्यांचे बंदोबस्तास नेमले. तेथे पंताची लढाई होऊन खाशास जखम लागून पंत हस्तगत जाले. त्यांचा मुलूक चवदा लक्षाचा सरकारजमेत आणिला व पंताकडील किले प्रचितगड व वासोटा, कागोरी

वगैरे लढून घेतले. नंतर बापूसाो पुणे मुकामी राहून सुरापुरावर बेरडाचे पारपत्यास आमचे चुलते व वडील गेले व भिल वगैरे बंडाचा बंदोबस्त आज्ञेप्रमाणे करून पारपत्ये केली. हे श्रीमंत राजश्री बाजीरावसाो यांचे दिमत आमचे चुलते व वडील याणी लढाईचे काम सुरापूर व भिल वगैरे बंडवाले यासी करून पारपत्ये केली हे जाणून प्रथम सरदारी आमचे चुलते विसाजी राम गोखले हे वडील व आमचे तीर्थरूप व आणखी तीन चुलते हे कनिष्ठ आसे पाच बंधू यांत सरदारी विसाजी राम वडील सबब त्याचे नावे स्वार २०० व पायदल २०० येकूण च्यारसे आसामी सरकारात ठेऊन खेरीज जातीची नेमणूक पाच बंधूंची शागीर्दपेशासुध्ध आलाहिदा नावनिसीवार यादी करून देऊन हुजूर ठेविले. पतक सरकार आज्ञेप्रो कामकाजाकरिता जात येत होते. पुढे पेशवे सरकारचा व कंपणी-सरकारचा बिघाड होऊन लढाई सुरू जाली ते वेलेस पेशवे सरकाराबरोबर फौजसुध्धा होते. ते समई पंढरपूरनजीक श्रीमंतांचे फौजेवर छापा पडल्यावर श्रीमंत उधळून गेले. ते वेलेस आमचे तीर्थरूप भास्कर राम हे मेहरबान आलपिष्टण साो याजला पुरंधर मुकामी येऊन भेटले. तेव्हां सर्व बंदोबस्ताचा वगैरे मजकूर बोलण्यात येऊन आमचे चुलते विसाजी राम याचे नावे पत्र फौजसुध्धां निघोन येण्याविसी ताा १४ मार्च सन १८१८ इाा रोजी पाठविले. त्यातील हसील की, बाजीरावसाो याणी कंपणी सरकारासी बिघाड केला त्याकरितां सरदारांचे नुकसान व्हावे आसी कंपणी सरकारची खायेष नाही. आा मेहेरबानाचे येणे जाले आसता बहुत खुषी आहे व ताा ९ माहे आप्रेल पावेतो येऊन पोहोचल्यास जातीचा व फौजेसुध्धा बंदोबस्त कंपणीसरकारातून होईल त्याची याद आलाहिदा करून दिल्ही आहे त्याप्रमाणे चालेल. याप्रमाणे पत्र व याद आल्यावरून आपले खावंदास सोडून कंपणी सरकारचे वचनावर व ठरावाचे यादीवर भरवसा ठेऊन कंपणी सरकार कराराप्रो पुस्त दरपुस्त चालवितील आसा विश्वास ठेऊन श्रीमंतापासून निघोन पंढरपूर मुकामी पाच साहा हजार फौजसुध्धा येऊन सरकारास जाहीर होण्याकरिता पत्र पाा. ते पत्र पाहून त्याचा जाब ताा १० मे सन १८१८ इाचे मितीचा पाठविला त्यांत मजकूर की, बराबरची फौज जिकडील तिकडे रवाना करून तुम्ही घरखटल्यानसी पुणे मुकामी येऊन दाखल व्हावे. त्याप्रमाणे खासगत स्वार व पायदल सुध्धां पुण्यास दाखल जाले. नंतर दोनसे स्वार व पंनास पायदल सरकारात ठेऊन, जातीस नेमणूक २५००० पंचवीस हजार रुो पाच बंधूस करून, येकंदर ठरावाची याद फौजसुध्धां १०१८०० येक लक्ष आठरासे रुपयाची करून दिल्ही होती. त्याप्रमाणे दोन वर्षे चालत आले. नंतर स्वार व पायदळ दूर करून पांच बंधू मिलोन जातीस सरमजाम

करकमभोसे माहाल रुो ३५००० पस्तीस हजारचा ठराऊन दिल्हा. त्याप्रमाणे आजमासे दोन वर्षे चालला. पुढे शेके १७४३ साली आमचे चुलते विसाजी राम गोखले मृत जाले, ते वेलेस पस्तीस हजाराचा सरमजाम सरकारात घेऊन विसाजीपंतदादा यांचे चिरंजीव रामचंद्र विश्वनाथ सुध्धां पांच आसामीस १०००० दाहा हजार रुो सरमजामाऐवजी पगार करून दिल्हा. त्याप्रमाणे पगार ज्याचे त्यास पावत गेले. पुढे आमचे तीर्थरूप याणी सरकारांत हरयेकविसी सरकार किफायतीची कामेकाजे करीत आले हे सरकारचे लक्षांत वागून, आमचे तीर्थरूपास मेहेरबान आलपिष्टण साहेब बाहदूर याणी विलायेतस जातेसमई पूर्वीचे २००० दोन हजार रुो नमणूक होती त्याखेरीज १००० येक हजार रुो जास्त करून दिल्हे. ते समई हा पगार सतत चालेल आसे बोलण्यांत होतें. त्याआन्वये कौंसलचा हुकूम आहे. त्याप्रमाणे नेमणूक आमचे वडील शेके १७६० साली मृत्य पावले तोपावेतों पावले. पुढे पगार बंद जाला. त्यास सदरी मजकूर सरकारांत कामेकाजे करून सरकार लक्षाप्रो वागणूक केली. आमचे वडिलांचे नांव दुसरे प्रतीत होते व त्याच प्रतींत मेहेरबान मलकमसाहेब गवरनर याणी माझे नांव दाखल केले आहे. परंतु आम्हांस पगार नाही व इनाम, वतन वगैरे काही येक नाही. यांजकरितां बहुत खराबीत आहोत. तो मजकूर व पूर्वील खानदानीचा मजकूर जाहीर होण्याकरितां ही याद गुजराणिली आहे. तरी सर्व मजकूर खावंदानी दिलांत आणून मेहेरबानी करून आमचे वडिलास सरमजामी पगार होता त्याप्रमाणे माझे नावे करून देणार खावंद आहेत. मेहेरबान आलपिष्टणसाहेब बाहदूर यांची पत्रे व ठरावाची याद येकूण तीन कागदाच्या नकला सरकारांत पाहण्याकरितां या यादीसमेत दिल्हा आहेत. आसल पाहावयाची मर्जी आसल्यास हजर आहेत. सारांष, आमचा बंदोबस्त करून देणार खावंदासिवाये दुसरा कोण आहे ? सर्व आधार साहेबाचा आहे. तारीख ५ माहे अगटंबर सन १८४३ इसवी.

सई: विश्वासराव भास्कर गोखले दस्तुर खुद.

¶*Vishwasrao Bhaskar Gokhale gives an account of his family and the services rendered by his father and uncle to the Peshwa Bajirao and to British officials. This family deserted Bajirao early and joined the English. They were near relations of Bapu Gokhale the famous supporter of Bajirao. The genealogy works out thus :—*

रामचंद्र गोखले

विसाजीराम	भास्करराम	आणखी तीन
मृ. श. १७४३.	मृ. श. १७६०.	
रामचंद्र	विश्वासराव (कैफीयतीचा लेखक)	

No. 38] [21-8-1822

ए. रु. १९

पो २३ माहे आगस्ट

सन १८२२ इसवी मुकाम पुणें

श्रीराम

आब कुच बदोबस्त होनेका

पहिलेई होगया आबकुच होनेका नै.

अर्जी वेंकटराव सिवाजी व घन:शाम दादाजी मराठे ऐसीजे. आम्ही श्रीमंत बाजीरांवसाहेब याचे स्वारीबराबर होतो. बापूसाहेब गोखले पडल्यानंतरहि दोन तीन मजला स्वारीसमागे होतोच. स्वारींतून माघारे आल्यावर राजश्री बालाजीपंत दादा नातू यांस साताऱ्याचे मुकामी भेटून कोल्हापुरास श्रीदेवीचे दर्शनास गेलों. तेथून यात्रेस गोकर्णास गेलो. पुढे मातुश्रीस समाधान नव्हते म्हणोन घरी राजापूर प्रांती आलो. तेथे मातुश्रीचा काल जाहाल्यामुळे येक वर्ष व्रतस्थ घरी राहून वर्षश्राद्ध जाहाल्यानंतर निघोन पुण्यास साहेब मेहरबान बडेसाहेब यांचे भेटीकरितां आलो. तो बडे साहेब मुंमईस गेले. आमची भेट जाहाली नाही. आम्ही श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब याचे कारकार्दीपासून पेशव्ये सरकारचे पदरचे. आमचे वडील दादो हरि व वामनाजी हरि याजकडे न्यायाधिशीचे वगैरे कामे सरकारांतून बहुत वर्षे होती. सरकारांतून तैनात नेमणुका चालत आल्या. प्रांत वसई व कल्याण वगैरे मुलुकहि आम्हाकडे होता. खर्ड्याचे साली श्रीमंताची आज्ञा जाहाल्यावरून औरंगाबाद प्रांतची आम्ही ठाणी घातली. त्याजवर अवरंगाबादचा सुभा पांच हजार फौजेनिसी तोफासुद्धां आम्हावर जालनापूरचे मुकामी चालून आले तेव्हां त्यांच्या आमच्या लढाया होऊन ते सिकस्त होऊन आम्हासी तह करून माघारे अवरंगाबादेस गेले. इत्यादि व पेशवे सरकारांत कामेकाजे बहुत केली त्यामुळे बाजीरावसाहेब लोभ करीत होते. येशवंतराव होलकर, दक्षणेस आले तेव्हा श्रीमंतानी मसलत विचारिल्यामुळे आमचे वडील दादो हरि यानी होलकरासी लढाईचा प्रसंग करू नये, समेट करून त्यासी रहस्य संपादावे ऐसे सांगितले, तें त्यांचे चितास आले नाही. लढाई होऊन श्रीमंत वसईस गेले. तेथून पुण्यास आल्यावर श्रीमंत अमृतराव साहेब व होलकर याचे आम्ही मिलाफी असा आरोप आम्हावर ठेऊन होलकर व सिंदे याजकडे वगैरे कोठे आम्ही जाऊ नये, याप्रमाणे जामीन आम्हास बापूसाहेब गोखले घेऊन त्याचे स्वाधीन केले. त्याजवर गोखले याचे द्वारे आमचे तैनातेचा बदोबस्त सालिना तीन हजार रुपये करून चालविले. त्याखेरीज नवीन सव्वाशे रुपये दरमाहा श्रीमंताचे खासगी

7618

पोत्याकडून पावत होता. याप्रमाणे सरकारांतून निर्वाह होत गेला. कंपणीसरकारांतून सर्वाबराबर आमचा बंदोबस्त व्हावा परंतु आम्ही ते वेळेस नव्हतो सबब राहिला. याजकरिता हाली साहेबांस अर्ज की साहेब धनी खावंद आहेत. आमचे पदरी खर्च मोठा, निर्वाह चालत नाही, यामुळे पुण्यात आमची गुजराण होत नाही. यास्तव साहेबी मेहरबान होऊन आम्हावर कृपा करून आमचे चालविले पाहिजे. मिति भाद्रपद शुद्ध पंचमी शके १७४४ चित्रभानुनाम सवत्छरे

¶*Venkatrao Shivaji and Ghansham Dadaji Marathe recount the services rendered by their ancestors to the Peshwa both in the judicial line and on the field. They add that they were taken to be the accomplices of Holkar and Amritrao and handed over for service to Bapu Gokhale with some remuneration. The writers ask for their remuneration being continued.*

No. 39] [*22-12-1843*

श्री

यादी व्यंकटराव व रामराव श्रीनिवास कोरेगावकर सुा आर्बा आर्बैन मयातैन व अलफ. आमचे वडील आजे शामराव आंबाजी हे सरकारचे पदरचे. पूर्वी पुरंधर वगैरे कोकणचे किल्याचे कामावर होते. तेव्हा कैलासवासी नानासाहेब पेशवे याणी श्रीमंत कैलासवासी थोरले शाहू माहाराज याजपासून पुरंधर किला आपले खासगीकडे मागून घेऊन घेऊन आमचे वडील कामगार चागले विश्वासुक म्हणौन मागून घेतले. त्याजकडे पुणे सुभ्याचे व किल्याचे काम होतेच तेव्हा पुणे सुभ्यास पाच हाजार रुो नेमणूक व इनामगाव जातीस व श्रीव्यंकेटशाचे उछाहास . असे दिल्हे ते चालत होते. पुढे शाहू माहाराज कैलासवासी जाहाल्यानंतर इकडील प्रांतीचे बंदोबस्तास आमचे आजे यास पाठविले ते समई पूर्वी उत्पन्न चालत होते ते चालऊन आणखी नवीन सुभा प्रांा वाई इलाखा सातारा येथे पाच हजार रुोची नेमणूक करून देऊन कसबे कोरेगाव पौा हुजूर मामल्याचा अमल लाऊन दिल्हा व आसाम्या व स्वार व गाव वगैरे उत्पन्न करून दिल्हे. त्याप्रो दोन माहाली पुस्त दरपुस्त अजे शामराव अंबाजी व चुलते सदासिव शामराव व श्रीपतराव बापूजी व गंगाधर शामराव व तीर्थरूप श्रीनिवास शामराव असे पाच पुरुषपर्येत निर्वेध चालले. त्याचा दाखला बाा सरकारी बेहेडे करार जाहालेले व पत्रे वगैरे बीाा

८०१६९ शामराव आबाजी व सदासिव शामराव मारनिलेचे चिरंजीव व श्रीपतराव बापूजी प्रा पुणे सुभ्याचे बहेड्यास २०२५७। रुो पौ बजा परभारे आसाम्याची चाकरी करून व खासगीचा लवाजमा व पालखी वगैरे शागीर्दपेशासुा १२६५४। रुो बाकी संसारकुटुंबाचे बेजमसि सरकारातून करार करून इनामगाव-सुधा दिल्हे ते रुा

५६७५ प्रा वाई सुभा येथे नेमणूक व दरखी असाम्या दोन मुजुमी व सबानिसी

५००० ऐन नेमणूक
५२५ मजुमी
१५० सबानिसी

५६७५

१३६९१।

या प्रो दोन माहाली उत्पन्न उत्पन्न मौजे बालेवाडी ताा हवेली हा गाव कैलासवासी शाहू माहाराज याणी दिल्हेला व नानासाहेब याणी कुटुंबाचे बेजमीस असाम्या व इनामगाव ... ... श्री देवाचे उछावास असे दिल्हेले चालत होते. त्याप्रो सरकार दफ्तरी दाखले आहेत. असे असता बाजीरावसाहेब याणी आपले कारकीर्दीत आम्हाकडे काही गुन्हा नसता आमचे सारे उत्पन्नाची वाताहात करून वाई सुभ्याचे नेमणुके पौ अडीच हजार रुो ठेविले ते कोरेगाव येथील पेशजीप्रो कोरेगाव येथील आमलाप्रो दिल्हे. ते वेळेस बाजीरावसाहेब याजपासी बहुत प्रकारे अर्ज केला परंतु दाद लागली नाही. निरोपाय जाणून आमचे तीर्थरूप घरी येऊन राहिले * * * * * * अलीकडे आमचे तीर्थरूप सन १८३८ इसवी साली मृत्य पावले * * * तारीख २२ दिजंबर सन १८४३

सही व्यकटराव व रामराव श्रीनिवास हस्त आक्षर रामराव श्रीनिवास

¶*Vyankatrao and Ramrao Shrinivas of Koregaon now surnamed Kirkole Diwan submit a Kaifiyat of their family recounting how their ancestor Shamrao Ambaji was appointed in charge of Purandhar by King Shahu and Peshwa Nanasaheb, what remuneration the family received in return for its service and how it was deprived of all that wi:out its fault. This family is connected with Shripat Bapuji.*

7620

[दुसऱ्या याच घराण्याच्या कैफियतींतून]

*   *   *   *   आमचे पणजे यास इनामी व सरजामी वेतन चालत होते. आमचे पणजे यास पुत्र.

१ वडील सदासिव शामराव त्यास पुत्र नारायणराव सदासिव मयत. त्याचे पुत्र विष्णु नारायण व सखाराम नारायण

१ आमचे आजे जीवनराव शामराव त्यास पुत्र महिपत जीवनराव मयत त्याचे पुत्र आम्ही [गंगाधर महिपत व दाजी महिपत]

१ श्रीनिवास शामराव यास पुत्र व्यकटराव श्रीनिवास व रामराव श्रीनिवास

¶*This is another genealogy of Vyankatrao Shrinivas of Koregaon.*

No. 40]   [*Recd. 1-11-1822*

पो १ नवंबर सन १८२२

तर्जुमा छ

श्रीलक्ष्मीप्रा

यादी अर्जी सदासिव रघुनाथ गद्रे सुा सलास अशेरीण मयातैन व अलफ. आम्हावर श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब याची राजकारणामुळे इतराजी होऊन सोळा वर्षे किले सिहिगड येथे अटकेत होतो. सरकार कंपिनीबाहादुर यासी बिघाड होणार सबब, आम्हास किल्यावरून काढून मोकले करून स्वारीबराबर घेतलें. आठ महिने स्वारीबराबर कसाला भोगला. आमची घरेदारे, श्रीमंताची स्वारी वसईहून पुणे मुकामी आल्यावर, आमचे कबिले घरातून बाहेर काढून, सदासिव माणकेश्वर याणी घेतली. दौलत असबाब सर्व बरबाद जाहाली. लाच्यार जालो. फकरुदीन हुसेनखान मुनसी याची आमची इंग्रेज कंपिनीबाहादुर याचे राजकारणावरून दोस्ती, आम्ही मदारुलमाम नाना फडणीस यांचे, सबब श्रीमंताचे दिलात खलेश[2] आम्हावर हरयेक बहाणा ठेऊन नजरबंद करावें हा मतलब समजल्यावरून आम्ही दौलतराव सिंदे याचे घरी मदारुलमाम साहेब याचे हमराह[3] नजरबंद जाहालो, ते वख्ती खंड पडला तो देऊन, बाकी काही चीजवस्त वगैरे व त्यास कामास पडले बडेखान नेक माणूस त्याजपासून बेमानपणा होणार नाही, इंग्र[illegible] याचे नौकर, त्याजवर पेशवे साहेब याचा दस्त चालणार नाही,

---

२ किल्मिष.   ३ बरोबर.

हा अंदेशा दिलात आणून, जवाहिर सोने रुपे कापड, वगैरे कागदपत्रसुधा त्याजवळ ठेव ठेविली. त्याचे भाईबंदास दखल व बयाजी नाईक यासहि माल्लम. आम्ही नजरबंद जाहाल्यावर फकरुदीन हुसेन याजवर पेच येऊन ते कैदेत पडोन तेहि तमाम जाले. त्याचे छोटे भाई निज्यामुदीन हुसेन हैदराबादेस होते ते बडोद्यास गेले. ते नेक होते तेहि मृत्यु पावले. आम्ही त्याजपासी ठेव मागावयाचा उपराळा करावा तर आम्ही कैदेत, कबिले अज्ञान, पदरचे कारकून अफरातफरा परागंदा जाहाले, नाइलाज; पुढे श्रीमंताचे स्वारीतून उबरखेडाहून पायउतारा बडोद्यास गायकवाड याजकडे कर्ज येणे व ठेवीचा ऐवज खानंमजकूर याजकडे येणे सबब तेथे गेलो. अजम रिसदेट कर्नेल साहेबाची मुलाकात घेऊन हकीकत जाहीर केली. त्याणी दीलदिलासा देऊन आमचा वाका साहेबास पुणे मुकामी लिहून पाठविला. साहेबाचा हुकुम देसी रवाना करण्याचा जाहाला, त्याजवरून त्याणी देसी रवानगी केली. खानाकडील मजकूर त्याचे छोटे भा[illegible] अजम कमालुदीन हुसेन स्वारीत महूवर होते त्यास पत्रे पाठविली. त्याणी दा[illegible] दिल्ही नाही. गायकवाड याजकडे ऐवज येणे त्याणीही काही दिल्हे नाही. साहेब मेहरबान होऊन लोकाकडे येणे ते व घरेदारे वगैरे देतील ही उमेद धरून देसी आलो. साहेबानी फक्त तीन हजार रुपये सालीना पेनसेन पेटिया करून दिल्हे. त्यात गुजारा होत नाही. त्यासिवाय सालीना हजार दोन हजार रुपये कर्ज होत आहे; व मागील देणेदाराचा पेच कर्जदारी निकड करितात. घरदारे सुटतात, त्याची रोहोपोहो करून तुमचा फैसला करतो असे सांगून आजपावेतो दिवस काढले; आता देणेदार मानीत नाहीत. साहेब मेहरबान होऊन आमची याद करून हकीकत पुसतील ही उमेद फार होती; परंतु नसिबाचे कंब्रख्तीने साहेबास याद होत नाही. आमचा दीन बदीन जैफीचा[1] दिवस लोकाचे देण्याचे पेचातून निघोन, साहेब देतात, त्यात गुजारा करून दुलयेदारीची हदपार करून, खुदाची बंदगी करावी हा दिलात हेत प्राप्त होऊन अर्जी लिहिली आहे. साहेबासिवाय दुसरे जाणत नाही. साहेब गरीब जवानदर्द जाफर मालक खावंद आहेत. राज्यातील लोकाचे साहेब चालवितात त्यात कसाले[2] गुजरले असेहि आहेत; परंतु आम्हावर कोणे तऱ्हेने कसेकसे गुजरले, आम्ही ज्याची चाकरी केली ती कशा नेकीने केली, ही छान साहेबी करून बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे, तर आमचा परिणाम लागतो; नाही तर नाइलाज गोष्ट आहे येविसीची कलमे :

१ आमचा वाडा व पागा बाग वगैरे दरोबस्त वस्तवानी कागदपत्रसमेत सदासिव माणकेश्वर याजकडे आहेत, ते आमचे आम्हास द्या[illegible]

१ वार्धक्याचा.

कैदेतून सोडून स्वारीबराबर घेतल तेव्हा वाडा तुमचा तुम्हास देऊ, बक्षीस केले नाहीत असे बोलण्यात आले, परंतु अवकाश पडला नाही म्हणोन तसेच राहिले. साहेबाचे पदरी पडलो. साहेब मालक खावंद आहेत. मेहेरबान होऊन आमची घरे वगैरे वस्तवानीसमेत आम्हास देवावी, म्हणजे आम्ही कलेल तसी व्यवस्ता करून, देणेदाराचे पेचातून मुक्त होऊ. कलम

१ वाडा देण्याविसी तूर्त काही दिरंग असल्यास आम्हास तर देणेदाराचा पेच भारी; त्यासी दुसरी गोष्ट सांगावयाची नाही. त्यास साहेब मेहेरबान होऊन दाहा हजार रुपये पेनसेन देतात; यासिवाय बक्षीस, आमची लाच्यारी जाणौन देऊन देणेदाराचे पेचातून काढावे; साहेब दर्द जाणून मेहेरबानी करीत आहेत. आम्हावर करून शेवा चाकरी घ्यावी. साहेबाचे म्हणवितो. कलम. १

१ फकरुदीन हुसेनखान याजकडे ठेवीचा ऐवज जवाहिर वगैर येणे येविसी त्यास ताकीद करून, आमची तोडपाड ठाणी आम्ही लाच्यार सबब रुपयाचे आठ आणे घ्यावयास साहेबाचे मारफतीने राजी. कलम १

१ आमचे कर्जवाम होलकर गायकवाड वगैर लोकाकडे येणे; त्यास ताकीद होऊन आम्हास देवावे व गणेश गोविंद भिडे याजकडे आमचा ठेवीचा ऐवज येणे. त्याणी आम्ही किल्यावरून सुटोन आल्यावर पत्र लिहून दिल्हे ते आम्हापासी आहे. कलम १

अर्जीची लिगा आहेत. मेहरबानी करून बंदोबस्त करून देणार साहेब खावंद आहेत.

¶*Sadashiv Raghunath Gadre, a banker of Poona, who was persecuted by Peshwa Bajirao because he was a relation of Nana Fadnis, submits this petition to the British authorities requesting an increase in his pension and the restoration of his property which was deposited with Fakruddin Hussein Munshi in the service of the British at Poona.*

7623

1

गोपाल [सुपेकर देशपांडे.]

- हरि
  - बलवंत
    - हरि
  - माधव
    - गोपाल
  - कृष्ण
    - नीलकंठ
- आनंदराव
  - गोपाल
    - गोविंद गोपाळ
    - गंगाबाई.

2

चिटणीस निा सरकार माहाराज सिंदे आलिजाबहादर
रघुनाथ मल्हार कुलकर्णी निगडीकर

[उपनाम निगडीकर गोत्र भारद्वाज सूत्र आश्वलायन कुलकर्णी मौजे निगडी ॥ मौजे चिखली तो उमरज प्रांत कराड.]

- आबाजी रघुनाथ
- कृष्णराव
  - गोविंदराव
  - नारायणराव
  - माधवराव
- गोपालराव

3

आवजी कवडे

- महिपतराव
  - अमृतराव
  - हैबतराव
  - माधवराव

महिपतराव कवडे इंग्रजी अमलात
गुरसाळ्याकडे गेला.
मौा गुरसल पोा करकंब.
7624

4

इच्छारामपंत ढेरे गोत्र वसिष्ठ सूत्र आस्वलायन

इच्छारामभट बिन शंकरभट ढेरे
- रामचंद्र
- हरि
  - रंगो
  - वामन
  - विनायक
  - माधव
  - पांडुरंग.

5

कृष्णंभट बिन कासीभट
- रामचंद्रभट
  - गोपाळभट
    - गोविंदभट
      - गोपाळभट
- त्रिंबकभट
  - नारायणभट
    - वासुदेवभट
      - श्रीपतभट
        - आत्मारामभट.
    - त्रिंबकभट
      - बालकृष्णभट
    - केशवभट
      - ०

कृष्णंभट बिन कासीभट राजऋत्रि सूत्र आश्वलायन
ज्यामदग्न वच्छ गोत्र धर्माधिकारी कसबे पुणे प्रां मजकूर.

6

एकबोटे–वंशावेल

१ रामाजी सिवाजी याचे पुत्र गुंडो रामाजी
१ बालाजी गोविंद यास पुत्र त्रिंबक बलाल व सदासिव बलाल
१ विठल गिरमाजी व केसो गिरमाजी
१ कोन्हेर त्रिंबक यास पुत्र चौघे

- नारो
  - नरसिंगराव
- रंगो
  - व्यंकटराव
- त्रिंबक
  - नरहर
    - दादो नरहर
      - राघो दादाजी
- चिटको
  - नारायण

7

घडफळे

गणेश नारायण

- अनंत
  - जगनाथ
- नीलकंठ
  - कल्याण
- चिंतामण
  - लक्ष्मण

8

चापाजी टिळेकर हुजऱ्या

संभाजी पाटील टिळेकर

- चापाजी
  - हणमंता
    - अमृतराव (पेशवाई अखेर)

9

जानू भिताडा

महिमाजी

- कानोजी
  - मायाजी
- जानू (पानपत)
  - मायाजी[१]
    - बहिरजी
- माहादजी

10

अंताजी आपाजी व जनार्दन आपाजी व चिटको आपाजी व हरि आपाजी उपनाम येरंडे गोत्र अत्रि सूत्र अश्वलायन कुलकर्णी मौजे परखंदी व मौजे सेपूरजन बुा निमे व मौजे खानापूर निमे समत हवेली प्रा वाई

जनार्दन आपाजी एरंडे

त्र्यंबकराव जनार्दन

11

चिव्हे किल्ले पुरंदर

चाहूजी नाईक

चिमाजी नाईक


कोंडाजी नाईक

येसाजी नाईक

- नारोजी
- सिवाजी.

---

१ कानोजीचा मुलगा मायाजी यास जानूजीनें दत्तक घेतलें. याबाबतींत आशेर मयांतैन अलफमध्ये चौकशी होऊन दत्तक कायम केला.


तुकारामबुवा
देहू
२ नारायण
२ माहादाजी
३ उधव गो
३ गणेश गो
३ गोविंद
३ आबाजी
४ खंडेरावबाबा
४ त्रिंबक
४ पिलाजी
४ हरजी
४ घनश्याम
४ सजणाजी
४ गोबदास
४ पांडोबा
४ भगवंत
४ विठोबा
४ महादेव
४ मुकुंद
४ जैराम
५ घनश्याम
५ रामचंद्र
५ राघोबा
५ रामचंद्र
५ जगन्नाथ
५ शिवराम
५ राजाराम
५ अमृतराव
५ दाजीबा
५ कान्होबा
५ रघुनाथ
५ अन्याबा
५ गोविंद
५ श्रीधर
५ बासुदेव
५ रामकृष्ण
५ पंढरी
६ अन्याबा
६ नामदेव
६ विठोबा
६ दामोदर
६ सखाराम
६ बज्याबा
६ विठोबा
६ एकनाथ
पंढरीनाथ
६ भाऊ

१८

13

सुपे सुभेदार

हरि

- त्र्यंबक ऊर्फ बाजी ?
  - आनंदराव
    - जिवाजी आनंदराव
- बाजी ?

14

धोंडो महादेव (सलास सितैन मया व अलफ)

कोंडो धोंडो सेनाकर्ते (सलास समानीन मया व अलफ)

- गोविंदराव
- रामचंद्र

आनंदराव सखदेव सेनाकर्ते
यास सकवारबाईचें पत्र आहे.

15

नरसिंगराव जनार्दन धायगुडे

हरबाजी नरसिंगराव

नारो हरि

16

नारो अनंत परचुरे

- नारो अनंत परचुरे
  - त्र्यंबकराव
  - बापूजी
  - विठल
  - आनंदराव
  - गोपाळराव ?
    - कासीराव
      - रामराम

17

परशरामपंत प्रतिनिधि

- परशरामपंत प्रतिनिधि
  - कृष्णराव
    - गंगाधरराव
      - भवानराव
        - परशरामपंत हाली आहेत
    - अमृतराव
      - कृष्णराव
    - त्रिंबकराव
      - भगवंतराव
        - आबाजीराव
          - भगवंतराव विशालगडास हाली आहेत.
    - यशवंतराव
    - सिवरामपंत
  - श्रीपतराव o
  - सदासिवराव o
  - जगजीवनराव o

¶*Here is a list of the members of the family of the Pratinidhis. The original list is presented here in a table for easy reference.*

18

पिलाजी जाधवराव

- सटवोजी जाधवराव
  - जोत्याजी जाधवराव वाडीकर
    - लाडोजी
      - नर्मदा=गणपतराव गायकवाड बडोदे
  - सुभानजी वाघोलीकर
    - संभाजी
      - भवानजी
      - पिलाजी
      - सटवाजी
    - मलोजी
      - बलवंतराव
      - नारायणराव
      - लक्ष्मणराव
      - भाऊ

19

प्रयाग अनंत फणसे गडकरी किले सातारा

- अंताजी प्रयाग
  - जोती अनंत

20

गुजर—वंशावेल

- १ प्रतापराव
  - २ खंडेराव
    - *
  - २ जगजीवन स्त्री कासीबाई
    - *
- १ सिवाजी
  - २ सयाजी
    - ३ सिदोजी

21

वंशवेल **रेटरेकर** देशस्थ ऋग्वेदी.

- भिवाजी
  - बाजी
    - बापूजी
      - नारायणराव
        - नकल
      - गोविंदराव
        - नकल
    - गंगाधर
      - माधवराव
        - रामचंद्र
          - बालकृष्ण
      - त्रिंबकराव
        - नारायण
        - वासुदेव
        - कृष्ण
    - मल्हार
  - चिमणाजी

22

बाबाजी विठल कारखानीस किले पुरंधर (समान आसरीन मया व अलफ)

- विठल दादाजी
  - दादो विठ्ठल
  - रामचंद्र विठ्ठल

महिपतराव व्यंकटेश

7632

23

काटे देशमुख

- बाळाजी काटे
  - धर्मोजी
    - शामराज (शहाजीचे वेळेस)
      - बावाजी
      - मानसिंग
        - धर्मोजी
        - रघूजी
  - संभाजी
    - माहाजी

24

माणकेश्वर धायगुडे

- माणकेश्वर धायगुडे
  - [पंचवीस हजार फौजेच्या सरंजाम] त्रिंबकराव माणकेश्वर [शाहू महाराजांचे हुजरातीस चाकर इहिदे खमसैन]
  - चिमणाजी माणकेश्वर [आठ हजार सरंजाम]
    - माणिकराव
      - अमृतराव
    - माधवराव
      - बळवंतराव
    - रामराव
      - चिमणाजी

(आर्बा समानीन मयाव अलफ)

25

माहादाजी कृष्ण जोशी चासकर

- कृष्णराव
  - रामचंद्र
    - नीलकंठ
      - माधवराव
        - कृष्णराव
- रामचंद्र [संपादन करणार]
  - नारो रामचंद्र
    - ०
- बालाजी
  - अमृतराव
    - गणपतराव
  - परशराम
    - सिवाजी
      - परशराम
      - कृष्ण
      - गोपाल
  - मेघश्याम
    - माधवराव
      - रामचंद्र
  - बालाजी
    - नकल

26

मोरोपंत पिंगळे—वंशावेल

- त्रिंबकराव
  - मोरोपंत
    - नीलकंठराव
      - ०
    - बहिरोपंत
      - आपाजीराव
        - नारायणराव
          - बहिरोपंत ऊर्फ आबासाहेब (इ. स. १८४३ त हयात)
    - येशवंतराव
      - गोविंदराव
        - राघोपंत
        - धोंडोपंत
        - नारोपंत
          - धोंडोपंत
          - माधवराव

27

- यशवंतराव पोतनीस
  - विठ्ठल यशवंत
    - भीवराव विठल

28

राघो लक्ष्मण पुरंदरे दिा मल्हारजी होळकर.

- भास्कर
  - विसाजी
    - गोमाजी
      - भैराल
        - रामराव
          - कृष्णराव
      - खंडो
        - मल्हार
          - नानाजी
          - सखाराम
          - चिंतो
          - विनायक
      - लक्ष्मण
        - राघो लक्ष्मण
          - लक्ष्मण
            - बापूजी
            - महिपतराव
          - राघो
    - काशी
    - गिरमाजी
      - रामचंद्र
        - लक्ष्मण
          - आनंदराव
          - शंकराजी
          - रामचंद्र
  - त्रिंबक+

29

रामचंद्र गणेश कानडे


वेदमूर्ति गणेशभट बिन केशवभट कानडे गोत्र शांडिल्य मौजे सोनोरी ताा कऱ्हेपठार प्राा पुणे येथे इनाम राज्याभिषेक शके ९१ फाल्गुन शुध्ध ६.

- गणेश केशव कानडे
  - रामचंद्र गणेश
    - माधवराव रामचंद्र
      - रामचंद्र माधव (दत्तक)
        - गणपतराव
          - माधवराव

+ हा अंबाजी त्रिंबक पुरंदरे याचा पूर्वज.

7635

आंबोकर—वंशवेल



+ आपाजी बाजीराव हे मल्हार तुकदेव पुरंदरे याचे जावई, मुलगी मथुराबाई.

31

- शंकराजी मल्हार
  - कृष्णाजी
    - जगन्नाथ

} पेंटा अंबाड

32

बाबूराव मल्हार बर्वे याच्या पदरचा **शामजी गोविंद टकले** निजामाकडे वकील

- गोविंद
  - शामजी
  - क्ष
    - लक्ष्मण
      - अमृतराव

मल्हारराव भिकाजी बर्वे, बाबूराव मल्हारचा नातू व अमृतराव लक्ष्मण टकले हे पेशवाई गेल्यानंतर औरंगाबादच्या इष्टेटीबद्दल भांडत होते.

33

शामराव आंबाजी किरकोळे (कोरेगांवकर)

[सबा सितैन मया अलफ माघमास मृत्यु]

- शामराव आंबाजी किरकोळे
  - सदाशिव
    - नारायणराव
      - शामराव *or* सखाराम ?
      - गोविंदराव
      - विष्णु
      - आनंदराव
  - जीवन शामराव
    - महिपत
      - गंगाधर
      - दाजी
  - श्रीनिवास शामराव
    - व्यंकटराव
    - रामराव

34

सोमवंशी

संतांजी

- प्रतापजी
- आपाजी
- रामराव
- तुकोजी
  - सुभानराव
  - माधवराव
- बाजीराव
- साखरोजी

35

गोपाळभट बर्वे

- लक्ष्मीबाई=गणेश गोपाळ
  - जानकीबाई=रघुनाथराव
  - कृष्णराव
  - गोपाळराव
- गोविंद गोपाळ=शिऊबाई
  - बाजीपंत बर्वे

36

१ तैंनातजाबता निा **हरि बलाल फडके** सुा सीत समानीन मया व अलफ खासा जातीस व पुत्र पुतण्ये मिलोन सालिनादेखील पालख्या वगैरे साल मजकुरांपासून रुा

४५०००

तपसील

३३५९०	खुद हरि बलाल
४४४६	मोरो बापूजी पुतण्ये पालखीसुधा
१३२८	नारो आबाजी पुतण्ये
३६०	धोंडो बलाल बंधु
५२७६	पुत्र रुा
५०००	चिंतामण हरि देखील पालखी
२७६	रामचंद्र हरि
४५०००	

[पुढे तपशील]

१ यादी हरि बलाल याजकडे फौजेचे बेगमीस सरंजाम सुा तिसा सबैन मया व अलफ स्वार ७५० साडेसातशे दर राऊती सालिना रुा ३०० तीनसेप्रमाणे रुा २२५००

सदाशिव नारायण व बापूजी बल्लाळ व आनंदराव भिकाजी उपनाम फडके गोत्र अत्रि सूत्र आश्वलायन वास्तव्य कसबा गुहागर यांसी तिसा सितैनांत नूतन इनाम द्यावयाचा करार केला. छ २० रावल तिसां चैत्रमास

बालंभट फडके

- बापूजी
  - मोरो
- आबाजी
  - गंगाधर
  - नारो
- हरि
  - रामचंद्र
- धोंडो

37

पारसनीस

बापूजी भीमसेन
|
कृष्णराव बापूजी (सीत सितैनात मृत्यु)
|
नारायणराव कृष्ण
|
भगवंतराव नारायण (सबा समानीन)

१ भास्करराव पारसनीस दिा हुजारत

पेठ्ये

१ त्रिंबकराव विश्वनाथ व माधवराव विश्वनाथ हे दोघे भाऊ विभक्त झाले (छ ६ जामादिलोवल कार्तिक) [खमस सितैन]

- त्र्यंबकराव
  - विश्वासराव
  - कृष्णराव ? (समान सबैन)
- माधवराव
  - पांडुरंग
  - मोरेश्वर माधवराव [तिसा सितैन]

१ अमृतराव विश्वनाथ यास साल मजकुरी सरंजाम दिल्हा

१ कृष्णराव त्रिंबक पेठे मृत्य पावले सबब (इसने समानीन मया व अलफ)

7639

38

राजमाचीकर व पेशवे

राजमाचीकर व पेशवे हे ह्या एकाच घराण्याच्या दोन शाखा होत हें पुढील वंशावलीवरून सिद्ध होतें. उपनाम भट गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायन देशमुख मामले दंडा राजपुरी.

- महादजीपंत
  - नारोपंत
    - माहादाजी
      - नारोपंत
        - त्रिंबकपंत
          - नारोपंत
            - रामराव
              - त्रिंबकराव [ह. इ. स. १८३०]
              - रामचंद्र [ह. इ. स. १८३०]
  - सिवाजीपंत
    - विश्वनाथ सिवाजी
      - बाळाजी विश्वनाथ

39

खरसीकर प्रभुणे

नारो गंगाधर ऊर्फ आयाबा मुजूमदार हा मौजे लोणी पा सुपे (लोणी भापकर ता. भिमथडी जि. पुणे) येथील कुलकर्णी उपनाम प्रभुणे. याचा भाऊ विनायक गंगाधर. त्याचा मुलगा चिंतो विनायक. विनायक गंगाधरासंबंधीं विशेष माहिती मिळत नाही. हा इ. स. १७४८ च्या सुमारास वारल्यानंतर त्याचा हुद्दा व उत्पन्न चिंतो विनायकाच्या नावे झाले. दिा हुजरात व राणोजी पवार विश्वासराव याजकडील विश्वासराईच्या सरंजामाची फडणिसी

चितोपंताकडे चालत होती. यासंबंधांत मौ. खरसी ता। कुडाळ प्रांत वाई या गांवाशी या घराण्याचा संबंध आल्यामुळें मुळचे 'प्रभुणे उपनाम मागे पडून खरसीकर' नावानें हे ओळखू लागले. यांचा वंशवेल असा

- दादाजी
  - गंगाधर
    - विनायक
      - चिंतोपंत
        - धोंडोपंत
          - चिंतोपंत
        - रघुनाथ
          - बळवंतराव
            - हैबतराव
          - विनायक
          - चिंतोपंत
          - रामचंद्र
      - बाबूराव
        - मोणकोपंत

40

विश्वनाथपंत बेहरे गोत्र बाभ्रव्य सूत्र आश्वलायन मुकादम ता। हातखंबे प्रां। राजापूर, ता। रत्नागिरि पुरातन वतनदार कसबा माजगांव ता। केळे यांस सलास समानीनांत पेशव्यांनीं २८ गांवची मोकदमी दिली.

- विश्वनाथपंत बेहरे
  - अंताजी
  - गणेश
    - आबाजी गणेश +

\+ यास बाप मृत्यु पावल्यावर सीत तिसैनांत नेमणूक झाली.

41

गदाधर प्रल्हाद प्रतिनिधिची वंशावळ [नगर जमाव रु. नं १९४३].

यांचा पूर्वज अनंतभट्ट त्रिंबकेश्वर गांवीं राहात असे. यास निजामशहा, मलिकंबर, शाहाजी व शिवाजी यांजकडून इनाम जमीन एक चाहूर चालविली. त्याच्या सनदा धामधुमींत नष्ट झाल्या तेव्हां गदाधर नारायण अग्निहोत्री यानें राज्याभिषेक शके १३ सालीं संभाजी माहाराजांस भेटून नूतनपत्रें करून घेतलीं. बहुधा हा रायगडचे वेढ्यांत शाहूबरोबर मोगलांचे हस्तगत होऊन त्याच्याच बरोबर त्याची सुटका झाली. पुढें शाहूनें त्यास आपला प्रतिनिधि नेमिलें. गदाधर प्रल्हाद मरण पावल्यावर तें पद कांहीं-काल नारायणभट याजकडे चाललें. पुढें प्रतिनिधिपद परशुराम त्रिंबकास परत दिलें तेव्हां शाहूनें महादाजी गदाधर यास अमात्यपद दिलें तें शाहूच्या मृत्युपावेतों त्याजकडे चाललें. रामराजानें अमात्यपद शिवराम रामचंद्र अमात्य यास दिलें. गदाधर प्रल्हाद हा काश्यप गोत्री देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, औरंगजेबाचे कैदेंत शाहूच्या सेवेस होता. प्रल्हाद निराजी म्हणून जो राजारामाचा प्रतिनिधि होता त्याचा या गदाधर प्रल्हादाशीं कांहीं संबंध नाहीं.

- अनंतभट
  - वासुदेवभट
  - हरिभट
  - नारायणभट
    - (वंशज) प्रल्हाद
      - गदाधर
        - महादजी
        - जगन्नाथ
          - आनंदराव
      - भटंभट
        - हरभट
          - बापूभट
            - दादंभट
      - नारायण
        - मल्हार[1]
          - गदाधर
          - नारो

१ हयात खमस खमसैन मया व अलफ

[उदाजीराव बिन अमृतराव हांडे देशमुख यांणी ही वंशावळ ... २९ फसली (इ. स. १८२९) सालांत दिलहेली आहे.]

नकल

१ मूल पुरुष देव... हांडे
यांणी पातशाहाची पिछाडी मारली व मालकावर वार के... सबब देशमुखीचे वतन दिल्हे यास पुत्र १

२ दादजी यास पुत्र

३ देवराऊ — ३ हरजी पुत्र

४ यास पुत्र राघोजी — ४ दादजी पुत्र

५ देवराव यास पुत्र २ — ५ येशवंतराव पुत्र २

६ हिरोजी — ६ दादजी — ६ राजजी यास पुत्र — ६ हरजीस पुत्र १

७ तुकोजी — ७ लिलोजी पुत्र ४ — ७ मानकोजी यास पुत्र २ — ७ जाखोजीस पुत्र २

८ त्रिंबकजी — ८ राघोजी — ८ नानाजी — ८ सखोजी — ८ सुलतानजी — ८ सुभानजी पुत्र ३ — ८ जानराव यास पुत्र १ — ८ रायाजी यास पुत्र २

९ तुकोजी — ९ राजाराम — ९ मोहनराव — ९ तुळजाजी — ९ राणोजी — ९ सिदोजी नकल — ९ आनंदराव — ९ तुळजाजी — ९ सटवाजी यास पुत्र ५ — ९ आनंदराव यास पुत्र २ — ९ शाहाजी पुत्र १

१० आप्पाजी — १० हिरोजी — १० अमृतराव — १० देवराव — १० सुरसिंगराव — १० भागवतराव — १० विठलराव — १० येशवंतराव — १० रामराव — १० महिपतराव — १० खंडेराव — १० नारायणराव — १० रायाजी — १० अमृतराव

११ उदाजीराव हाली आहेत, स. १८२९.

Index to Selection No. 44

Some Historical Families

[Figures refer to numbers of letters. Only the letters have been indexed. For a list of the genealogies see the introductory note.]

MO-II Bk Ca 23—13

D—*contd.*

E

F

G

H

K

K—*contd.*

L

M